# मेहता मराठी ग्रंथजगत

ऑगस्ट, २०२१
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष एकविसावे
अंक आठवा



पुस्तकांची किंमत
रत्नांहूनही जास्त असते,
कारण पुस्तके अंतःकरण
उज्ज्वल करतात.

-महात्मा गांधी

१५ ऑगस्ट


स्वातंत्र्यदिनाच्या
हार्दिक शुभेच्छा !

नवीन संहिता... नवा आशय...

छत्रपती संभाजीराजांच्या पराक्रमाचे,
शौर्याचे, राष्ट्रनिष्ठेचे आणि
त्यांच्या हृदयस्थ जखमांचे दर्शन घडवत
त्यांची डागाळलेली प्रतिमा
उजळ करणारा ग्रंथ

# छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ

संपादक
## डॉ.जयसिंगराव पवार




पृष्ठसंख्या : १०२४
किंमत : ₹१२००
पोस्टेज : ₹१००

Book Available

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑगस्ट २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक आठवा

**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

योजना यादव, पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **श्रद्धांजली** | १६ |
| **विशेष लेख** | २० |
| **विशेष लेख** | २४ |
| **विशेष लेख** | २८ |
| **एक एक पान घडताना...** | ३२ |
| **पुस्तक परिचय** | |
| क्रांतिसिंह नाना पाटील | ४० |
| समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज | ४४ |
| छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ | ४६ |
| वेध अमुच्या इतिहासाचा | ४८ |
| **अभिप्राय** | ५६ |
| **दिनविशेष** | ६२ |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

संपादकीय



# मनभावन श्रावण

‘उत्सवेन बिना यस्मात् स्थापनम् निष्फलम् भवेत’ अर्थात कोणताही प्रयत्न, कोणताही संकल्प हा उत्सवाशिवाय यशस्वी होत नाही आणि आपला महाराष्ट्र तर उत्सवांची परंपराच लाभलेला. जगण्यातला उत्साह वाढवण्यासाठी ‘उत्सव’, तर कठीण परिस्थितीत आपली सहनशीलता टिकवून ठेवण्यासाठी ‘सण’ साजरे करण्याचं निमित्त आपण शोधत राहतो.

नुकतीच आषाढवारी संपली. कोव्हिड निर्बंधांमुळे यंदाही वारकऱ्यांची दिंडी रस्त्यावर चालली नाही. वैष्णवांचा मेळा विठूच्या गजरात पंढरपुरात जमला नाही; तरीही त्यांच्या भक्तीत कुठेही खंड पडलेला दिसला नाही. ऋतुमानानुसार बदलत जाणारं हवामान आणि त्यानुसार आपल्याकडे साजरे होणारे सण हे निसर्ग आणि मानवी जगण्याचं चक्र सुरू ठेवतात. माणसामाणसांतला एकोपा जपायला मदत करतात.

ऑगस्ट महिना तसा अनेक अंगांनी महत्त्वाचा. स्वातंत्र्य, संघर्ष, मैत्री, श्रावण, पाऊस आणि सण अशा कितीतरी कारणांनी आपलं महत्त्व अधोरेखित करणारा. ऊन-पावसाच्या खेळात होणारं श्रावणाचं आगमन

आणि त्याला जोडून येणाऱ्या मानवी भावनाही तितक्याच अलवार आणि हळुवार आहेत. अगदी बोरकर म्हणतात तसं, 'समुद्र बिलोरी ऐना, सृष्टीला पाचवा महिना' या पाचव्या महिन्यातल्या श्रावणाचं सौंदर्य डोळ्यांना दिसायला जितकं अद्‌भुत तितकंच निसर्गाच्या विविध रंगरूपानं मनाला नवचैतन्य देणारं आहे. याच महिन्यात मैत्रीचा उत्सवही तितक्याच उल्हासात साजरा होतो. ऑगस्टचा पहिला रविवार साधून एकमेकांच्या हातावर सॅटीनचे फ्रेन्डशिप बँड बांधत, फुलं देत 'फ्रेन्डशिप डे' सेलिब्रेट करण्याची लाट अनेक वर्षांपूर्वी भारतीय तरुणाईत पसरली आणि बघता बघता तो एक ट्रेन्ड बनला. स्थळकाळाचं, वयाचं, जाती-धर्माचं कसलंकसलंच बंधन नसलेली मैत्री एखाद्या दिवसापुरती साजरी करण्याइतपत मर्यादित नसली तरी, या महिन्यात तिचं विशेष कौतुक केलं जातं, हे मात्र खरं ! या मैत्रीच्या उत्सवात भर टाकण्यासाठी आपल्या सच्च्या मित्रांची, अर्थात पुस्तकांची साथ आपल्याला लाभली तर 'सोनेपे सुहागा'! मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित केली गेलेली लुईसा मे ॲल्कॉट लिखित आणि शांता शेळके अनुवादित 'चौघीजणी,' उमेश कदम यांचे 'एक होता मित्र', डेबोरा एलीस लिखित आणि श्यामला पेंडसे अनुवादित 'ट्रू ब्लू', तसेच चेतन भगत यांची 'फाईव्ह पॉइन्ट समवन' आणि 'द थ्री मिस्टेक ऑफ माय लाईफ' ही पुस्तके मैत्रीचा आनंद द्विगुणित करायला नवं कारण देतात.

या महिन्याचं अजून एक खास वैशिष्ट्य म्हणजे येत्या १५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळून तब्बल ७५ वर्षं पूर्ण होतायत. या अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण करताना १३० कोटी देशवासीयांच्या भावना, त्यांची मतं, सूचना आणि त्यांची स्वप्नंही सोबत असणार आहेत. या महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर देशभरात वेगवेगळे संकल्प आखले जात आहेत. त्यापैकी एक महत्त्वाचा संकल्प म्हणजे 'सह्याद्री देवराई'चे प्रमुख असलेल्या सयाजी शिंदे यांनी राबवलेली 'गाव तिथे देवराई' ही योजना. या संकल्पनेअंतर्गत स्वतंत्र भारताच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून प्रत्येक गावात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड आणि प्रत्येक गावातल्या देवस्थान परिसरात देवराई उभी करण्याचा निर्धार केला आहे. सृजनाचा, नव्या अंकुराच्या रुजण्याचा महिना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या श्रावणात अशी महत्त्वाची योजना

राबवली जातेय, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

आगामी काळात डॉ. जयसिंगराव पवार यांची इतिहासपर संशोधन असलेली आणि संपादित केलेली बहुचर्चित अशी चार पुस्तकं आम्ही आपल्या भेटीस घेऊन येत आहोत. त्यापैकी 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ' या पुस्तकात संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेतलेला असून, त्यातून होणारं संभाजीराजांचं दर्शन आणि त्यांच्या व्यक्तिचित्रणातील सत्यासत्यता याची सविस्तर आणि ससंदर्भ चर्चा वाचायला मिळते. त्यासोबतच 'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू महाराज' या पुस्तकात शाहू महाराजांचे जीवन आणि त्यांच्या कार्याचा विस्तार याविषयी अभ्यासपूर्ण लेखन केले गेले आहे. थोर स्वातंत्र्यसेनानी, पत्री सरकारचे संस्थापक आणि ग्रामराज्याचा प्रयोग राबवणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केलेल्या कार्याची ओळख आजच्या तरुण पिढीला, विद्यार्थीवर्गाला व्हावी या हेतूने 'क्रांतिसिंह नाना पाटील' हे पुस्तक, तर मराठेशाहीतील मातब्बर व्यक्तिमत्त्व उलगडत जाणारा प्रदीर्घ पट 'वेध अमुच्या इतिहासाचा' ह्या पुस्तकात मांडला असून, त्याचे विश्लेषण करतानाची त्यांची बहुआयामी दृष्टी, भाषिक शैली व ऐतिहासिक संदर्भ यांच्या सुयोग्य मिलाफाची अनुभूती देणारं हे पुस्तक महत्त्वाचं आहे.

याच काळात मराठी साहित्य वर्तुळात आपलं अमूल्य योगदान देणारे दोन महत्त्वाचे लेखक काळाच्या पडद्याआड गेले. ते म्हणजे 'वाचणाऱ्याची रोजनिशी' लिहून लेखक-वाचकांमधला दुवा जोडणारे, साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ लेखक श्री. सतीश काळसेकर आणि दुसरे म्हणजे साहित्यासोबतच क्रिकेट क्षेत्रात विपुल लेखन करणारे, 'अरण्यकांड' आणि 'अगतिक' या गाजलेल्या कादंबऱ्यांचे लेखक  श्री. अनंत मनोहर. आपली अमूल्य ग्रंथसंपदा वाचकांसाठी मागे ठेवून गेलेल्या या दोन्ही लेखकांना भावपूर्ण श्रद्धांजली. लिहिणारी माणसे आपल्यातून निघून गेली तरीही त्यांच्या लिखाणातून आपल्यासोबत कायमच वावरत असतात.

हा वाचनवसा निरंतर ठेवण्यासाठी आपण प्रयत्नशील राहूया.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# मेहता पब्लिशिंग हाऊस

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**



# स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

*भारताला स्वातंत्र्य मिळून*
*यंदा ७५ वर्षं पूर्ण होत आहेत,*
*त्यानिमित्ताने...*

१९४५ साली दुसरं महायुद्ध संपलं आणि भारताच्या स्वातंत्र्य चळवळीला एक नवीन स्वरूप प्राप्त झालं. १९४२च्या लढ्याने आणि सुभाषचंद्र बोस यांच्या नेतृत्वातील Indian National Army (INA) ने भारतीयांची ताकद दाखवून दिली होती. त्यातच ब्रिटिशांनी जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल यांची तुरुंगातून मुक्तता करत भारतीय स्वातंत्र्यचळवळीत चैतन्यच निर्माण केलं.

१९४५ च्या सुमारास भारतीयांमध्ये एक नवा उत्साह संचारला होता. त्यातच INAच्या जनरल शाह नवाज, गार्डियल सिंग धिल्लन, प्रेम सहगल या अधिकाऱ्यांवर ब्रिटिशांनी दिल्लीच्या लाल किल्ल्यात खटला भरला. हे अधिकारी आधी ब्रिटिश सैन्यातील भारतीय अधिकारी होते. मात्र त्यांनी ब्रिटिशांबरोबर फितुरी केली, असा आरोप त्यांच्यावर

ठेवण्यात आला. त्यामुळे देशभरात संतापाची लाट आली. या अधिकाऱ्यांना लोकांनी नायकाचं रूप दिलं. एकूणच, भारतीयांच्या मताकडे दुर्लक्ष करता येणार नाही, हे ब्रिटिशांच्या लक्षात आलं.

तिथे दुसऱ्या बाजूला दुसरं महायुद्ध संपल्यानंतर जागतिक पातळीवर मोठे बदल झाले होते. अमेरिका आणि सोव्हिएत युनियन (रशिया) जगातले शक्तिशाली देश म्हणून उदयाला आले. या दोन देशांनीही भारताच्या स्वातंत्र्याच्या मागणीला पाठिंबा दिला.

ब्रिटिशांचा दुसऱ्या महायुद्धात विजय झाला असला तरी, संरक्षण आणि आर्थिक पातळीवर त्यांची परिस्थिती बिकट झाली होती. इंग्लंडमध्ये सत्तांतर झालं होतं. हुजूर पक्षाऐवजी आता मजूर पक्षाची सत्ता आली होती आणि त्यांनी काँग्रेसच्या मागण्यांना पाठिंबा दिला होता. ब्रिटिश सैन्य आता युद्ध करून थकलं होतं. मायदेशापासून दूर (म्हणजे भारतातही) राहण्याची त्यांची तयारी नव्हती.

तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे ब्रिटिशांचा त्यांच्या प्रशासनातील भारतीय लोकांवर विश्वास उरला नव्हता. भारतीय लोक आता काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. संपूर्ण देशात हरताळ, संप, आंदोलनांचं पीक आलं होतं. भारतीय सैन्यात या बंडखोरीचा शिरकाव झाला होता. सैन्याच्या तिन्ही दलांत असलेल्या असंतोषाला २० जानेवारी, १९४६ला कराचीत तोंड फुटलं. ते लोण मुंबई, लाहोर, दिल्ली या ठिकाणी पोहोचलं. १८ फेब्रुवारी, १९४६ला तलवार या युद्धनौकेवर स्वातंत्र्ययुद्धाचे निशाण लावले गेले. १९ फेब्रुवारीला आरमारातील शस्त्रं घेऊन भारतीय स्वातंत्र्यसैनिक बाहेर पडले. सैनिकांनी ब्रिटिशांचा युनियन जॅक हा झेंडा खाली खेचला आणि त्याजागी तिरंगा उभारला आणि ते ब्रिटिश अधिकाऱ्यांवर तुटून पडले. पुढचे चार दिवस हे रणकंदन मुंबईत सुरू होतं.

कॅबिनेट मिशन - या संपूर्ण चळवळींचा परिपाक असा झाला, की ब्रिटिशांनी मार्च १९४६मध्ये 'कॅबिनेट मिशन' भारतात पाठवलं आणि भारतात सत्तांतरणाच्या हालचाली सुरू झाल्या. प्रादेशिक स्वायत्तता आणि एकता अबाधित राहील अशा प्रकारची योजना त्यांनी मांडली. या योजनेला काँग्रेस आणि मुस्लीम लीग दोघांनीही आधी मान्यता दिली; मात्र अंतरिम सरकारच्या रचनेबद्दल या दोन पक्षांत एकमत होऊ शकलं नाही. या अंतरिम

सरकारवर एकसंध भारताची घटना तयार करण्याची जबाबदारी होती. पुढे कॅबिनेट मिशनने ठेवलेल्या प्रस्तावाचा या दोन्ही पक्षांनी वेगळाच अर्थ काढला होता. शेवटी सप्टेंबर १९४६मध्ये अंतरिम कॅबिनेटची स्थापना नेहरूंच्या नेतृत्वाखाली झाली. मुस्लीम लीग आधी या कॅबिनेटमध्ये सहभागी झाली नाही. ऑक्टोबरमध्ये काहीशा निरुत्साहानेच मुस्लीम लीग त्यात सामील झाली. शेवटी २० फेब्रुवारी, १९४७ला तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान रिचर्ड ॲटली यांनी घोषणा केली, की ब्रिटिश ३० जून, १९४८ रोजी भारत सोडून जातील. विशिष्ट तारखेची घोषणा केल्यामुळे काँग्रेस आणि मुस्लीम लीग यांच्यातला वाद मिटेल, ही एक भूमिका ब्रिटिश सरकारची होती. त्याचबरोबर ब्रिटिशांचे आता भारतावर नियंत्रण उरलेले नाही, अशा आशयाचा अहवाल तत्कालीन व्हॉइसरॉय व्हेवेल यांनी ब्रिटिश सरकारकडे पाठवला होता. तोही नाकारणं ब्रिटिश सरकारला शक्य नव्हतं. तसंच ब्रिटिश भारत सोडताहेत यावर शिक्कामोर्तब करण्यासाठी आधी ही विशिष्ट तारीख निवडण्यात आली.

या बहुप्रतिक्षित घोषणेची तमाम भारतीय वाट पाहत असले तरी स्वातंत्र्याचं क्षितीज अद्यापही दूर होतं. कारण भारताच्या या स्वातंत्र्यलढ्याला एक किनार होती ती हिंदू मुस्लीम संघर्षाची मुस्लिमांसाठी वेगळे मतदारसंघ असावेत या मागणीपासून सुरू झालेला हिंदू मुस्लीम संघर्ष १९४६ मध्ये टोकाला गेला होता. या दोन धर्मांत प्रचंड हिंसाचार झाला. त्यात अनेकांना जीव गमवावा लागला. महात्मा गांधी या सर्व प्रकारामुळे प्रचंड व्यथित झाले होते. पूर्व बंगाल आणि बिहारमध्ये या संघर्षाने उग्र रुप धारण केले होते. महात्मा गांधी आणि इतर राष्ट्रीय नेते ही समस्या सोडवण्यासाठी निकराचे प्रयत्न करत होते, मात्र त्यांना यश येत नव्हते.

माऊंटबॅटन यांचा प्रवेश - लॉर्ड लुईस माऊंटबॅटन हे ब्रिटिश सरकारमधील अतिशय महत्त्वाचे अधिकारी होते. दोन्ही जागतिक महायुद्धात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. भारताला स्वातंत्र्य मिळणार हे स्पष्ट झाल्यानंतर ब्रिटिश सरकारने भारतीय नेत्यांशी चर्चा करून माऊंटबॅटन यांना पुढच्या वाटाघाटींसाठी भारतात पाठवलं. ते भारतातील शेवटचे व्हॉईसरॉय ठरले.

भारत स्वतंत्र झाला तरी भारताची फाळणी होणार हे तेव्हापर्यंत स्पष्ट

झालं होतं. हिंदू मुस्लीम संघर्ष आणखी तीव्र होऊन रक्तपात होण्यापेक्षा फाळणीला राष्ट्रीय नेत्यांनी मान्यता दिली होती. माऊंटबॅटन भारतात अतिशय आव्हानात्मक परिस्थितीत आले. ब्रिटिश भारत सोडतील पण त्यासाठी एक विशिष्ट तारीख असावी असा आग्रह माऊंटबॅटन यांनीच पंतप्रधान ॲटली यांच्याकडं धरला असं ते सांगतात. कारण विशिष्ट तारीख ठरली नाही तर परिस्थिती बदलणार नाही असा युक्तिवाद त्यांनी केला. मात्र एक विशिष्ट तारीख असावी असा आग्रह लॉर्ड वेव्हेल यांनी धरल्याचा उल्लेख बिपन चंद्रा यांच्या India's struggle for Independance या पुस्तकात आढळतो. माऊंटबॅटन भारतात आल्यावर त्यांनी परिस्थितीचा अंदाज घेतला. आधीच्या व्हॉईसरॉयपेक्षा त्यांना निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य अधिक होतं तरीही ते पदोपदी ब्रिटिशांचा सल्ला घेत असत. भारतात जास्तीत जास्त एकी रहावी यासाठी ऑक्टोबर १९४७ पर्यंत निकराचे प्रयत्न करत रहावे, असा आदेश त्यांना देण्यात आला होता. मात्र त्यासंदर्भात ते फारसं काही करू शकणार नाही असं त्यांच्या लक्षात आलं होतं. मोहम्मद अली जीना पाकिस्तानच्या मागणीवर अडून बसले होते. ते कोणत्याही स्थितीत ऐकायला तयार नाहीत असं चित्र त्यांनी तयार केलं होतं.

ज्येष्ठ पत्रकार कुलदीप नय्यर त्यांच्या Beyond the lines यांच्या आत्मचरित्रात माऊंटबॅटन यांच्या मन:स्थितीबद्दल लिहितात, माऊंटबॅटन यांच्यासाठी ही वाटचाल सुरुवातीपासूनच सोपी नव्हती. काँग्रेसच्या नेत्यांना मुस्लीम लीगबरोबर कोणत्याही प्रकारच्या वाटाघाटी करायच्या नव्हत्या. शक्य झाल्यास एकसंध भारत किंवा मग फाळणी हे सूत्र माऊंटबॅटन यांच्या डोक्यात पक्कं होतं.

या सर्व घडामोडींमुळे भारताला आणखी लवकर स्वातंत्र्य मिळणार हे स्पष्ट झालं होतं. ३ जून , १९४७ ला माऊंटबॅटन यांनी स्वत:ची एक योजना आणली. त्याला 'माऊंटबॅटन योजना' म्हणतात. त्यात फाळणीचा उल्लेख होताच. त्याचबरोबर संस्थानांना कुठे जायचं याचं स्वातंत्र्य होतं. तसंच दोन्ही देशांची सीमा ठरवण्यासाठी एका आयोगाची स्थापना करण्यात येईल अशा तरतुदी या योजनेत होत्या. पाकिस्तानची घटना लिहिण्यासाठी एक वेगळी समिती असेल या अन्य तरतुदी त्यात होत्या. ब्रिटिश संसदेने या

योजनेला मान्यता दिली आणि भारत १५ ऑगस्ट, १९४७ ला स्वतंत्र होणार हे स्पष्ट झालं.

खरंतर १५ ऑगस्टच का या प्रश्नाच्या उत्तरादाखल 'फ्रीडम ॲट मिडनाईट' या पुस्तकात माऊंटबॅटन यांच्या विधानाचा उल्लेख आहे. ते म्हणतात, ही तारीख एकदम निवडण्यात आली. खरंतर एका प्रश्नाच्या उत्तरादाखल मी ती विशिष्ट तारीख जाहीर केली होती. मी या संपूर्ण घटनाक्रमाचा सूत्रधार होतो. जेव्हा मला सांगण्यात आलं की आपल्याला एखादी तारीख ठरवायची आहे. तेव्हा मला कळलं की ती लवकरच असायला हवी. मी तोपर्यंत फारसा विचार केला नव्हता. ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यातली तारीख ठरवायची होती हे पक्कं होतं. मग माझ्या मनात १५ ऑगस्ट ही तारीख आली. कारण जपानने दुसऱ्या महायुद्धात शरणागती पत्करून दोन वर्षं झाली होती.

३० जून १९४८ ही तारीख ठरली असताना भारताला लवकर स्वातंत्र्य देणं यामागील काही कारणं ज्येष्ठ इतिहासकार बिपन चंद्रा त्यांच्या India's struggle for independence या पुस्तकात उद्धृत करतात. त्यांच्यामते भारतातील धार्मिक तेढ हाताळणं ब्रिटिशांना दिवसेंदिवस कठीण झालं होतं. त्यामुळे लवकर स्वातंत्र्य दिलं तर ब्रिटिशांची त्यातून सुटका होईल. काही ब्रिटिश अधिकारी तर इंग्लंडला जाण्यासाठी डोळे लावूनच बसले होते. भारताच्या बाजूनेही ब्रिटिशांवर दबाव होताच. तुम्ही स्वत:ही नीट राज्य करत नाही आणि आम्हालाही करू देत नाही, अशी टीका वल्लभभाई पटेल यांनी माऊंटबॅटन यांच्यावर केली होती.

भारताला स्वातंत्र्य मिळालं तरी एकसंध भारत अस्तित्वात आला नाहीच. एकसंध भारत असावा अशी आमची इच्छा होती असं वक्तव्य तत्कालीन ब्रिटिश पंतप्रधान रिचर्ड ॲटली यांनी केलं होतं.


**– रोहन नामजोशी**
(बीबीसी मराठी प्रतिनिधी)

**नवी संहिता... नवा आशय...**

**अकबर बिरबल मालिका**

सच्चेपणा, बुद्धिचातुर्य व
हजरजबाबीपणाचा दिलखुलास नजराणा


## अशी जिरवली सरदारांची




## अकबराचा जप




## चिलखताची पारख




## दयाळू बिरबल




**लेखक**
**मंजूषा आमडेकर**



**संपूर्ण सचित्र**

पृष्ठसंख्या प्रत्येकी ९६
किंमत प्रत्येकी १९५/-रु.
पोस्टेज प्रत्येकी ५०/-रु.


श्रद्धांजली



# ज्येष्ठ कवी, सामाजिक कार्यकर्ते सतीश काळसेकर यांचे निधन

साठोत्तरी काळातील महानगरीय संवेदना आपल्या कवितांमधून नेमकेपणाने टिपणारे ज्येष्ठ कवी म्हणजे सतीश काळसेकर. लेखक, संपादक, अनुवादक, सामाजिक कार्यकर्ते आणि डाव्या विचारसरणीचे प्रणेते म्हणून सर्वश्रुत असलेल्या काळसेकरांचं वयाच्या ७८व्या वर्षी, शुक्रवार दि. २४ जुलै २०२१ रोजी हृदयविकाराच्या झटक्यानं निधन झालं. त्यांच्या निधनामुळे नवोदित लेखक, कवींचा हक्काचा मार्गदर्शक हरपल्याची भावना मराठी साहित्य वर्तुळातून व्यक्त होत आहे.

सिंधुदुर्गातील मालवण तालुक्यातील काळसे या गावी जन्मलेल्या सतीश काळसेकर यांचं बीएपर्यंतचं महाविद्यालयीन शिक्षण मुंबईत झालं. त्यानंतर त्यांनी काही काळ 'ज्ञानदूत मासिक', 'टाईम्स ऑफ इंडिया', आणि 'बँक ऑफ बडोदा'मध्ये नोकरी केली. त्यांच्या वाङ्मयीन कारकिर्दीची सुरुवात काव्य लेखनानं झाली असून सुरुवातीला महाविद्यालयातील नियतकालिके, वर्तमानपत्रे, आणि त्यानंतर विविध वाङ्मयीन नियतकालिकांतून त्यांच्या कविता प्रसिद्ध होत होत्या. १९७१मध्ये त्यांचा



पहिला कवितासंग्रह ‘इंद्रियोपनिषद्’ प्रकाशित झाला. या कविता संग्रहानं त्यांना साहित्य वर्तुळात ओळख मिळवून दिली. त्यानंतर त्यांनी साहित्य क्षेत्रात चौफेर मुशाफिरी करत कविता, अनुवाद, गद्य असे वेगवेगळे साहित्य प्रकार त्यांनी हाताळले. सन २०१४ मध्ये त्यांच्या ‘वाचणाऱ्याची रोजनिशी’ या पुस्तकाला ‘साहित्य अकादमी’ पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

मराठी कवितांसोबतच प्रसिद्ध हिंदी कवी अरुण कमल यांच्या ‘नव्या वसाहतीत’ या कवितासंग्रहाचा अनुवाद तसेच हिंदी, बंगाली, मल्याळम्, इंग्रजी आणि पंजाबीसह इतर भाषांमधील कवितांचेही मराठीत अनुवाद काळसेकरांनी केले आहेत. महाश्वेतादेवी तसेच रस्किन बॉन्ड या लेखकांच्या कथांचे अनुवाद आणि देशविदेशातील अनेक महत्त्वाच्या कवींचा मराठी वाचकांना परिचय करून देण्यात काळसेकरांचे मोठे योगदान मानले जाते.

वाचनाचा दांडगा व्यासंग असलेल्या काळसेकारांना साहित्य अकादमी सोबतच ‘सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार’, ‘लालजी पेंडसे पुरस्कार’, ‘बहिणाबाई पुरस्कार’, ‘कवीवर्य कुसुमाग्रज पुरस्कार’, ‘राज्य शासनाचा पुरस्कार’, ‘कैफी आझमी पुरस्कार’, ‘महाराष्ट्र शासनाचा कृष्णराव भालेकर पुरस्कार’, ‘आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार’ आणि ‘महाराष्ट्र फाऊंडेशन ग्रंथ पुरस्कार’ देऊन गौरविण्यात आलं आहे.

जगण्याबद्दल व माणसांबद्दल कुठल्याही प्रकारची कटुता मनात येऊ न देता सर्वच क्षेत्रातील माणसं जोडणारा लेखक काळाच्या पडद्याआड गेल्याने मराठी साहित्याची अपरिमित हानी झाली आहे. पुस्तकांवर भरभरून प्रेम करणाऱ्या या लेखकास भावपूर्ण श्रद्धांजली.

## मराठी साहित्यातील ‘अनंत’ ठेवा हरपला !

आपल्या दमदार शैलीतील लेखनाने साहित्य क्षेत्रात एक वेगळा ठसा उमठवणारे ज्येष्ठ साहित्यिक अनंत मनोहर यांचं पुण्यात वयाच्या ९२व्या वर्षी निधन झालं. ते एक उत्तम दर्जाचे व्यासंगी लेखक तर होतेच त्यासोबतच



क्रिकेट क्षेत्रातील जाणकार आणि क्रिकेट सामन्यांचे समालोचक म्हणूनही प्रसिध्द होते. एक उत्तम कादंबरीकार, कथाकार, अनुवादक, ललित लेखक, प्रवास वर्णनकार, चरित्र लेखक, स्फुट लेखक, नभोनाट्य अनुवादक, एकांकिका, कुमार साहित्य, कथा लेखक, रहस्यकथा लेखक अशा कितीतरी साहित्य प्रकारात लेखन करणारे मनोहर आयुष्याचा बराच काळ बेळगावमध्ये वास्तव्यास होते. आधी बेळगावच्या राणी पार्वतीदेवी महाविद्यालयात प्राध्यापक त्यानंतर कर्नाटक विद्यापीठाच्या धारवाड केंद्रात अतिथी प्राध्यापाक म्हणून काम करत होते.

वन्यप्राणी आणि आदिवासी यांच्या संघर्षावरील 'अरण्यकांड' आणि बाल अत्याचाराचा विषय नेमका आणि प्रभावीपणे मांडणारी 'अगतिक' या त्यांच्या दोन कादंबऱ्या सर्वांत जास्त प्रसिद्ध आहेत. त्यासोबतच 'वाटचाल', 'उदास', 'ज्येष्ठ', 'सचिन तेंडुलकर समग्र चरित्र', 'द्वारकाविनाश', 'पहाटवारा', 'राब', 'दोन मुठी तांदूळ', 'कापुराच्या वाती', 'पैलतीर', 'प्रतिष्ठा', 'लसयुक्त', या कादंबऱ्या तर 'रंदा', 'अगतिक', 'फिनिक्स', 'पाठलाग', 'मर्मबंधातली ठेव ही', 'नभ मेघांनी आक्रमिले' 'त्या नदीच्या पार वेड्या' या रुपांतरीत कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. शिवाय 'विक्रमादित्य गावसकर', 'युगकर्ता सचिन', 'जर्मन टार्गेट' अशी जवळपास ऐंशीहून अधिक ग्रंथसंग्रह असलेली विपुल साहित्य संपदा मनोहरांनी लिहून ठेवली आहे.

सीमाभागात मराठी, कन्नड आणि इंग्रजीचा मोठा प्रभाव आहे. त्यामुळे बेळगावमध्ये कन्नड, मराठी, कोकणी, ख्रिश्चन, मुस्लीम अशी मिश्र संस्कृती पहायला मिळत असून त्याचा परिणाम अनंत मनोहरांच्या लिखाणावर झालेला दिसून येतो. आयुष्यात बहुश्रुतता जपत साहित्यसेवा करणाऱ्या या लेखकाचा 'महाराष्ट्र उत्कृष्ट वांङ्मय निर्मिती पुरस्कार', 'महाराष्ट्र साहित्य परिषद' तसेच सोलापूरचा 'भैरू रतन दमानी पुरस्कार' देऊन सन्मान केला गेला आहे. मराठी भाषा आणि वाङ्मय संस्कृती यात संवाद साधणारा महत्वाचा दुवा असलेला एक महत्वाचा तारा निखळला.

## नवी संहिता... नवा आशय...




शांतता आणि प्रेम या बुद्धाने दिलेल्या
देणग्यांच्या साथीने स्वतःचे जग
सुंदर करण्याचा प्रयत्न करणारी 'चुटकी'

# चुटकीचं जग

संपूर्ण सचित्र

**फारूक एस. काझी**

पृष्ठसंख्या : ९६ । किंमत : १९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.

---


**४थी आवृत्ती**

सुमारे ४५० वर्षांपासून निसर्गातल्या गोष्टींचा उपयोग करून मुलांचं मनोरंजन आणि संस्कार करणाऱ्या पंचतंत्रातल्या गोष्टी !

# पंचतंत्रातील बोधप्रद गोष्टी

# पंचतंत्रातील मनोरंजक गोष्टी

लेखक : **अनिल किणीकर**




संपूर्ण सचित्र




पृष्ठसंख्या ८०
किंमत १७०/-रु.
पोस्टेज ५०/-रु.

पृष्ठसंख्या ७२
किंमत १७०/-रु.
पोस्टेज ५०/-रु.

विशेष लेख

# साध्या, सच्च्या, आणि आपल्या... सुधाताई!

*ज्येष्ठ लेखिका पद्मश्री सुधा मूर्ती येत्या १९ ऑगस्टला ७२व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्या निमित्ताने त्यांचे साहित्य मराठीत अनुवादित करून मराठी वाचकांपर्यंत पोचवणाऱ्या अनुवादिका लीना सोहोनी यांनी त्यांच्या सहवासात टिपलेले क्षण...*

ही ३१ मे ची गोष्ट आहे. सकाळी पावणे सातची वेळ असेल. हातात वर्तमानपत्र घेऊन चहाचा पहिला घोट घेतला आणि मोबाईलची रिंग वाजली. स्क्रीनवर उमटलेलं नाव पाहून मी चहाचा कप खाली ठेवून, खुर्चीतून उठून उभी राहिले. कारण ते नावच तसं होतं.

''लीना, मी सुधा मूर्ती बोलत आहे!'' पलिकडून तो ओळखीचा आवाज आला. ''आज मुद्दाम पहाटे उठून साडेपाच वाजताच तुझी मुलाखत अगदी पूर्ण पाहिली, ऐकली. मग दिवसभर वेळ मिळत नाही ना..! '' असं म्हणून त्यांनी बोलायला सुरवात केली.

नंतरची १५ मिनिटं सुधाताई माझ्या मुलाखतीविषयी भरभरून बोलत होत्या. दोन दिवसांपूर्वीच 'इ-प्रसारण' या वेबसाईटवर माझी मुलाखत प्रसारित झाली होती. ही मुलाखत जरा खास होती, कारण मी त्यात सुधाताईंविषयी बरंच बोलले होते, म्हणून मी त्यांना त्याची लिंक ई-मेल

वर पाठवली होती. नेहमीसारखं अवघ्या दोन तासात त्यांचं मेल मिळाल्याचं औपचारिक उत्तरही आलं होतं, तरीपण त्या ती मुलाखत आवर्जून बघतील, किंबहुना त्यांना त्यासाठी वेळ मिळेल याची मी अपेक्षा केली नव्हती. पण त्यांनी ती मुलाखत नुसती वरवर ऐकलेली नव्हती. त्यातील अनेक मुद्द्यांवर त्यांनी माझ्याशी चर्चा केली. १५ मिनिटांनंतर मी जेव्हा फोन ठेवला, त्यानंतरचा दिवस मी माझी राहिलेच नव्हते.

तर अशा सुधाताई. मायाळू, प्रेमळ आणि आपल्या साध्या सरळ निरहंकारी बोलण्याने समोरच्याला आपलंसं करणाऱ्या.

आयुष्यात काही माणसांची भेट होणं हा निव्वळ योगायोग नसतो, तर त्या भेटीमागे नक्कीच ईश्वरी योजना असते. सुधा मूर्तींची आणि माझी भेट एका कार्यक्रमाच्या निमित्ताने झाली, आणि ती भेट माझ्या आयुष्याला एक निराळंच वळण देऊन गेली. बघता बघता सुधाताई माझ्या आयुष्याचा भाग बनून गेल्या.

सुमारे १२-१३ वर्षांपूर्वीची गोष्ट असेल. तेव्हा मी कोल्हापूरला राहात होते. एका कार्यक्रमाला सुधाताई स्वतः उपस्थित राहणार होत्या. कार्यक्रमानंतर भोजनाच्यावेळी त्या आणि मी शेजारीच बसलो होतो. तेव्हापर्यंत त्या फक्त कन्नड भाषेतूनच लेखन करत असत. माझ्याशी बोलता बोलता त्या म्हणाल्या, मी गेले काही महिने एका वृत्तपत्रासाठी स्तंभलेखन केलं आहे, ते इंग्लिशमध्ये आहे. ते पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे. मी त्याचं नावही ठरवून ठेवलं आहे. 'वाईज अँड अदरवाईज' तुम्हाला त्याचा अनुवाद करायला आवडेल का? वास्तविक पुस्तक न वाचता मी असं कधी काम स्वीकारत नाही. पण त्या दिवशी मात्र मी त्यांच्या व्यक्तिमत्वाने इतकी भारावून गेले होते की, मी त्यांना होकार देऊन टाकला. त्यांनी लगेच माझा मेल आय डी घेतला आणि त्यानंतर दोन दिवसाच्या आत पूर्ण पुस्तकाची संहिता ई-मेलने मला मिळाली. ते पुस्तक अजून इंग्लिश मध्ये प्रकाशितसुद्धा झालेलं नव्हतं. पायरसीच्या (वाङ्मय चौर्याच्या) जमान्यात अशी अप्रकाशित पुस्तकाची संहिता एका अनोळखी लेखिकेकडे सोपवण्याइतका विश्वास त्यांना माझ्याबद्दल कसा काय वाटला असेल? त्या



दिवसानंतर मी त्यांच्या पुस्तकांचा अनुवाद सुरू केला.

त्यांनी पुस्तक लिहावं आणि मी त्याचा समरसून अनुवाद करावा हे जणू ठरूनच गेलं. अशा पुण्यवान व्यक्तीशी या अनुवादाच्या निमित्ताने माझं नाव जोडलं गेलं आहे, ही माझ्यासाठी फार मोठी गोष्ट आहे.

सुधाताईंची सर्वच पुस्तकं लोकप्रियतेचा उच्चांक गाठतात. त्यांचे मराठी अनुवादही त्याला अपवाद नाहीत. मला बरेच वाचक सुधाताईंच्या पुस्तकांमुळेच ओळखतात. त्यांच्या लेखनाला एक युनिव्हर्सल अपील आहे, त्यात एक साधेपणा, एक सच्चेपणा आहे, त्यामुळेच त्यांचे विचार भाषेच्या सीमा ओलांडून अनुवादाच्या माध्यमातूनही वाचकांना तेवढ्याच ताकदीने भिडतात.

माझ्या लेखनाच्या कामामुळे मला आजवर अनेक तथाकथित सेलेब्रिटीजना भेटायचा योग आला. त्यातल्या काहींचे नखरे, किंवा विक्षिप्तपणे मला अगदी जवळून पाहायला मिळाले. सगळ्या मोठ्या माणसांचे पाय मातीचेच असतात, असं आपण ऐकतो; पण आयुष्यात इतकी उंची गाठून सुद्धा जिचे पाय जमिनीवर आहेत अशी सुधा मूर्ती ही एक व्यक्ती मला जवळून पहायला मिळाली. त्यांच्याच एका पुस्तकाच्या मराठी अनुवादाच्या प्रकाशन समारंभाच्या वेळी व्यासपीठावर मला जवळ घेऊन त्या म्हणाल्या होत्या ही लीना तर माझी यशोदा आहे! आज प्रकाशित होणारं हे पुस्तक आमचं दोघींचं आहे. मी जर त्याची जन्मदाती आई असले तर लीनाला यशोदाच म्हणावं लागेल. नंतरही अनेकदा वेगवेगळ्या मुलाखतींमधून त्यांनी याच गोष्टीचा परत उच्चार केला. आणि नुकत्याच 'माझा कट्टा'वर झालेल्या मुलाखतीत तर मी त्यांच्या मुलीसारखी असल्याचं त्यांनी म्हटलं. जगातील कोणत्याही पुरस्कारापेक्षा याचं मोल माझ्यासाठी जास्त आहे.

सुधाताई, आता या ऑगस्ट महिन्याच्या १९ तारखेला तुमचा वाढदिवस आहे. तुम्ही ७१व्या वर्षात पदार्पण करत आहात. आयुष्याच्या पुढील वाटचालीसाठी तुम्हाला माझ्याकडून व तुमच्यावर प्रेम करणाऱ्या तुमच्या लाखो वाचकांकडून खूप खूप शुभेच्छा!!!!

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.
author@mehtapublishinghouse.com

**— सौ. लीना सोहोनी, पुणे**
(Email : leena.n.sohoni@gmail.com)

# पुस्तकं

पुस्तके स्वप्नात येतात आणि विचारतात,
'तू आम्हास ओळखले का?'

बोलता बोलता पुस्तके वितळतात
आणि अथांग पाणी होऊन हेलावत विचारतात
'तू आमच्यात कधी न्हालास का? पोहलास का?'

पुस्तके मग घनदाट वृक्ष होतात
आणि विचारतात,
'आमची फळे खाल्लीस का?
छायेत कधी विसावलास का?'

पुस्तके भुरुभुरु वाहणारा वारा होतात
नि विचारतात,
'श्वासाबरोबर आम्हाला कधी उरात साठवलेस का?'

पुस्तके असेच काही विचारीत राहतात
एकामागून एक.

प्रत्येक प्रश्नाला माझे काही उत्तर नसते;
मी गप्प बसतो त्यांच्याकडे नुसता पाहत.

तेव्हा पुस्तके सजावटीच्या कपाटात जाऊन बसतात
नि म्हणतात,
'म्हणजे आमचे आयुष्य व्यर्थच ना?'

पुस्तके मूक होतात,
झुरत जातात,
स्वतःला वाळवीच्या स्वाधीन करतात,
शेवटी आत्महत्या करतात ती-
घरातल्या घरात,
बंद कपाटाच्या कारागृहात...

**– शंकर वैद्य**

विशेष लेख

# शान्ताबाई आणि लुईसाबाई

*ऑगस्ट महिन्याचा पहिला रविवार मैत्रीच्या उत्सवाचा दिवस म्हणून ओळखला जातो. या निमित्ताने मैत्री आणि स्नेह यातील जिव्हाळा अधोरखित करणाऱ्या लुईसा मे अल्कॉट लिखित आणि शान्ता शेळके अनुवादित 'चौघीजणी' या पुस्तकावर विशेष लेख...*

चार बहिणी- मेग, जो, बेथ आणि ॲमी आणि घरासमोर राहणारा त्यांचा दोस्त लॉरी. त्यांचा तो निर्मळ स्नेह. कधी नात्यात उद्‌भवणारे ताण, आयुष्याने दिलेले धडे, बेथचा चटका लावणारा आणि वाचकाला अत्यंत समृद्ध करणारा अकाली मृत्यू, जोची लेखननिष्ठा... आणि या सगळ्या चित्रावर प्रेमळ लक्ष ठेवणारी त्यांची 'मार्मी' - मिसेस मार्च! जिथे आज घराघरात भांडणं होताहेत, भाऊबंदकी होते आहे, दोन पिढ्यांचा जिथे घरात संवादच संपताना दिसतो आहे, त्या काळात 'चौघीजणी' (किंवा मूळचं 'लिटिल विमेन') हे घरगुती असा शिक्का बसलेलं पुस्तक अधिकच मोलाचं आहे. समाजमानसानं शिकून घ्यावं असंही पुष्कळ या 'घरगुती' कथानकामध्ये आहे. मुळात लुईसा मे ॲल्कॉट हिने पहिलं 'लिटिल वुमेन' लिहिलं आणि प्रकाशकांच्या मागणीमुळे, वाचकांच्या जबरदस्त रेट्यामुळे त्याचा पुढचा भाग 'गुड वाइव्हज' या नावानं लिहिला. शांता शेळके यांनी दोन्ही भाग एकत्र करीत त्याचा अनुवाद 'चौघीजणी' या नावाने मराठीमध्ये आणला. पण त्यांनी फक्त अनुवाद आणला असं झालं नाही, त्यांनी कॉँकर्डचं ते सारं उदार वैचारिक वातावरण- ज्याचा थोरो, इमर्सन, लुईसाचे वडील ब्रॉन्सन आणि नॅथॅनिएल हॉथोर्न हिस्सा होते- ते मराठी बोटांमध्ये घट्ट चिमूट पकडावी तसं पकडून आणलं. किती विलक्षण गहिरा अनुवाद शांताबाईंनी केला आहे! तो एक स्वतंत्र लेखाचा विषय आहे खरा; पण जाताजाता

उदाहरणे देतो. विसाव्या प्रकरणाचं शीर्षक 'कॉन्फिडेन्शल' असं आहे. त्याचा अनुवाद 'गोपनीय' असा न करता शांताबाई 'थोडेसे खाजगी' असा करतात. 'Jo was very near Crying' या वाक्याचा अनुवाद शांताबाईंनी 'एकदा ती रडण्याच्या बेतात आली होती' असा केला आहे. त्यामधला तो 'बेतात' हा शब्द खास मराठी वळण त्या वाक्याला देतो. जो रडण्याच्या 'जवळ/नजीक' येत नाही, 'बेतात' येते ! आणि कादंबरीमधील गाणी आणि कविता...? तो तर शांताबाईंचा हातखंडाच. एकेकदा शांताबाई मूळ गाण्याचा कैक योजनेवर पोचल्या आहेत अनुवाद करता करता.

'He that is humble ever shall, Have God to be his Guide'

या ओळीमध्ये देव हा गाईड आहे. मार्गदर्शक आहे. पण शांताबाई लिहितात

'लीनपणे जो जगे तयाला पतनाचे भय कधीच नाही
कुणी न ज्याचे देव तयाचा सदैव सहचर होऊन राही!'

आणि मग देव प्रवासातला सखा होतो, सहचर होतो!

सारखं वाटतं,- शांताबाई आणि लुईसाचा पिंड एकसारखा असला पाहिजे. लुईसाचे वडील ब्रॉन्सन हे काँकर्ड त्या वैचारिक वातावरणात शिक्षणाचे अभिनव प्रयोग राबवत होते. (प्रोफेसर भायर 'व्ही' हे अक्षर शिकवताना पाठीवर झोपून पाय वर 'व्ही'च्या आकारात करतात, हे कादंबरीत आहेच.) पण ब्रॉन्सनच्या वैचारिक प्रयोगांची जबरदस्त किंमत त्याच्या कुटुंबीयांना भुकेच्या रूपाने, गरिबीच्या रूपाने द्यावी लागत होती. तरुण होताहोता लुईसाने पहिला निश्चय केला तो आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हायचा. घराला एखादा मुलगा सांभाळेल तसं सांभाळायचा. शांताबाईंनी अनुवादाच्या प्रस्तावनेत लिहिलं आहे.- ''तिने विवाह केला नाही. वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी ती निधन पावली. 'लिटल विमेन' हे पुस्तक हेच तिचे खरे वाङ्मयीन स्मारक होय.'' मग वाटतं- शांताबाईंनी त्यांच्या

‘धूळपाटी’ या आत्मकथनामध्ये स्वत:विषयी केलेले अनेक उल्लेख हे लुईसाच्या चित्राला जवळचे आहेत. दोघींचा स्वत:च्या पायावर ठामपणे उभं राहण्याचा निश्चय असो, किंवा त्यांच्या वाढत्या वयात त्यांच्यावर झालेले थोड्या निराळ्या वळणाचे संस्कार असोत; लुईसा आणि शांताबाई यांची सर्वसाधारण चाहत्यांमध्ये जी प्रतिमा होती त्यापेक्षा त्यांचं जगणं नक्कीच असांकेतिक होतं. जोचं लग्न हे प्रकाशकांच्या आग्रहाखातरच लुईसानं ‘गुड वाइव्हज्’ मध्ये लावलं होतं. आणि शांताबाईंनीही प्रांजळपणे आपण अनुवाद, सदरलेखन हे आर्थिक निकडीपायी केल्याचं लिहून ठेवलं आहे. पण कुठल्याच व्यावहारिक तडजोडीचा वासही येऊ नये इतकं दोघींचं काम. मूळ पुस्तक आणि अनुवाद हे सशक्त, स्वयंभू आहे !

‘चौघीजणी’ ही युटोपीया असलेली कुटुंबकथा आहे, असं समीक्षकांनी म्हटलं खरं; पण नीना ऑरबॅचसारख्या संशोधकांनी त्या विधानाची मर्यादाही दाखवली आहे. आपण हे लक्षात घ्यायला हवं की, ‘चौघीजणी’ मध्ये फादर मार्च हे पाहुण्यासारखे येतात-जातात. घरी चार मुली, एक आई आणि हॅना असं सहा स्त्रियांचं राज्य आहे. थेरोला आत्मशोध घ्यायला घर सोडून वॉल्डेन तलावाकाठी दोन वर्षे रहावं लागलं. (आणि त्याची फलश्रुतीही त्यांच्या मतेच साशंक स्वरूपाची आहे.) ‘चौघीजणी’मधल्या स्त्रिया या स्वत:च्या जिवावर स्वत:चं एक स्वयंपूर्ण ‘कम्यून’ चालवतात (जे गौरी देशपांडे यांना फार हवं होतं.), स्वत:चे निर्णय स्वत: घेतात आणि आपल्या कोषात न राहता जगालाही जोडत जातात. जो ही तासनतास वाचत, लिहित बसते. ॲमी गरम कोळशाने घरभर पसारा घालत चित्रे काढते. आजारी बेथ ही मांजरींसाठी ‘घरटी’ बनवण्याचं सुतारकाम- जे ‘पुरुषी’ काम आहे- ते करते आणि मेगला खरं तर अभिनेत्री व्हायचं होतं, असा उल्लेख पुढच्या ‘जोज् बॉइज’ या पुस्तकात येतो! एखादं घर ‘मॉडर्न आर्ट’वाल्या कलंदर मंडळींनी भरलेलं असावं तसं मार्च कुटुंबीयांचं घर आहे. अगदी लग्न करतानाही नवऱ्याचा आवाज साक्ष घेताना थरथरतो. फादर मार्च गहिवरतात. पण शांताबाईंच्या भाषेत- ‘एकटी मेग मात्र ताठ उभी होती. तिने निर्भयपणे ब्रुकच्या डोळ्याला डोळे भिडवले आणि प्रत्येक शपथ स्वच्छ, ठाम, ठाशीव शब्दांत उच्चारली.’ यातला ‘निर्भय’ हा शब्द मूलभूत आहे या पुस्तकासंदर्भात. ते केवळ ‘बायकांचं घरगुती कथन’ नाही. निर्भय स्त्रियांचं स्वत:च्या निवडीने जगणंही त्या संहितेत आहे. म्हणूनच जो ही अविवाहित राहण्याची धास्ती असतानाही लॉरीला नाकारते आणि मेग श्रीमंत मुलगा न पटकावता मध्यमवर्गीय ब्रुकची निवड करते. जोचं लग्न प्रकाशकांच्या रेट्यामुळेचं झालं. पण प्रोफेसर भायरसारखी असांकेतिक व्यक्ती जोडीदार म्हणून लेखिकेने निवडली, हेही पुष्कळसं स्त्रीवादी मांडणीला जवळ जाणार आहे. लुईसाची पात्रे सज्जन, निरागस आहेत म्हणून त्याला ‘युटोपिया’ म्हणणं हे

धाडसाचं ठरेल. साहित्यात डिस्टोपिया इतकाच युटोपियाही महत्त्वाचा असतो. स्वप्नरंजन आणि दु:स्वप्नरंजन या दोन्ही मानवी मनाच्या प्रेरणा आहेत. त्या साहित्यात उतराव्यात यात आश्चर्य नाही. मराठीतही कधी कधी 'वास्तववादी' (नैराश्यग्रस्त!) अस्तित्ववादी अशा विशेषणांनी एखादी साहित्यकृती गौरविली जाते. आणि मला वाटतं, मेघना पेठे यांनी पुण्याला भरलेल्या साहित्य संमेलनात 'कुटुंबकथा' या प्रकारची आवश्यकता सणसणीत तऱ्हेने मांडली होती, त्यामागे हेही एक अदृश्य कारण असावं. जोवर घर आहे तोवर कुटुंबकथा असणार, इतकं सरळ आहे हे! लेखक घरचं लिहितोय का दारचं, हे जितकं महत्त्वाचं आहे, त्याहून कितीतरी पटीनं मुळात तो ते कसं लिहितो आहे, हे बघणं महत्त्वाचं आहे!

आणि माझ्या माहितीतले कितीतरी उत्तम पुरुष वाचकही 'चौघीजणी'चे, उदाहरणार्थ, 'फॅन'आहेत! अनेकांना लॉरीने पुरुषाने स्त्रियांशी सौहार्दपूर्ण, मैत्रीपूर्ण तऱ्हेनं कसं वागावं याची नकळत दिशाही दिली आहे. अनेक पुरुष वाचकांना फादर मार्चसारखं सतत घराबाहेर 'युद्धा'ला सामोरं जायचा अनुभव आहे आणि मग घरातलं काय निसटलं आहे आपल्या हातून, हेही त्यांना वाचता वाचता ध्यानात आलं आहे. आणि गमतीत मुलीला किती छान तऱ्हेनं 'प्रपोज' करावं, हे मला, माझ्या समवयस्क मित्रांना लॉरीने समजावून सांगितलं आहे.

आणि तरीही वेगळ्या नजरेतून 'चौघीजणी' हे बायांचं हक्काचं पुस्तक आहे. सध्याची इंग्रजीमधील आघाडीची कवयित्री नमिथा वर्मा हिने आपल्या एका कवितेत कपाटाचे खण उघडल्यावर होणारी भावनिक आंदोलने आपल्या कवितेत मांडली आहेत...

'When we open our old drawers, And find those sheets...

wanting to throw them, and cherishing their memory'

आणि ही 'जो' बघा चार बहिणींचे लाकडी खण-पेट्या उघडून बसली आहे...

'ओळीने ठेवल्या इथे चार पेट्या, चौघी बहिणींच्या आवडीच्या मोठ्या
जीवन-मृत्यूत सुखात-दु:खात, नित्य त्यांनी केली परस्परा साथ...'

नाती तुटतात अशा वेगाने गरगरून टाकणाऱ्या या काळात एकमेकांना साथ देणाऱ्या या बहिणी मला अधिकच आवडू लागल्या आहेत. आणि दीडशे वर्षाच्या कालपटलावरचं लुईसा ते शांताबाई ते नमिथा यांचं एकाच वेळी कणखर, बंडखोर आणि 'घरगुती' असलेलं शब्द-संवेदन मला मायेनं जोजवतं आहे!

# डुप्लिकेट पुस्तके विकणाऱ्याचा केला पर्दाफाश !

*पायरेटेड पुस्तके आणि त्यांची वाढती अवैध विक्री ही पुस्तक प्रकाशन आणि विक्रेत्यांसाठी वेगळीच डोकेदुखी आहे. याविरोधात गेल्या अनेक दिवसांपासून जनजागृती करत असताना पुण्यात पुन्हा एकदा अशा पुस्तकांची विक्री करणारा एक भामटा पकडला गेला. त्याच्याविरोधात पोलिसात तक्रारदेखील केली असून, 'संभाजी'कार विश्वास पाटील यांनी फेसबुकवर पोस्टच्या माध्यमातून हा प्रकार उघडकीस आणला.*

पुस्तकांच्या पायरसीचे ग्रहण दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहे. अशात 'संभाजी'कार विश्वास पाटील आणि मेहता पब्लिशिंग हाऊसने वैयक्तिक पातळीवर शक्य तितके प्रयत्न सुरू केले आहेत. श्री. विश्वास पाटील पुस्तकांच्या पायरसीविरोधात जनजागृतीसाठी अत्यंत कळकळीने कार्य करत आहेत. त्यांनी सोशल मीडियाचा आधार घेत नुकताच एका अवैध पुस्तक विक्री करणाऱ्या भामट्याचा पर्दाफाश केला. त्यांची खाली दिलेली फेसबुक पोस्ट अनेक माध्यमांमधून शेअर झाली. पायरसी रोखण्याचा हा प्रयत्न फलरूप होवो, हीच सदिच्छा.




**डुप्लिकेट पुस्तके विकणारा पुण्याचा भामटा**

**पोलीस कारवाईसाठी रीतसर तक्रार दाखल!**

एफसी रोडला एक अंड्यासारख्या मोठ्या डोळ्यांचा पुणेरी भामटा डुप्लिकेट पुस्तके विकताना आढळला. त्याच्या सोबतच्या चोराचाही फोटो सोबत दिसतो आहे.

वाचकहो, नकली पुस्तकाचा धंदा करणारे परप्रांतीय पेंढारी गेल्या दोन-चार वर्षापासून मराठी भाषेचे मोठे नुकसान करत आहेत. बड्या बड्या लेखकांची अत्यंत टुकार कागदावर नकली पुस्तके छापून स्वस्तात विकायचा गैरप्रकार घडवत आहेत. अशाच एका भामट्याला परवा आमचे प्रकाशक मित्र सुनील मेहता यांनी पकडले. त्याच्याबाबत पुणे पोलीस आयुक्तांकडे रीतसर तक्रारही नोंदविण्यात आली आहे. नकली पुस्तके चार महिन्यातच काळी पडतात. त्यांचे बायडिंग निसटते. मग वाचकांना जेव्हा आपली फसगत झाल्याचे लक्षात येते, तेव्हा वेळ निघून गेलेली असते.



मराठीतील शिवाजी सावंत, रणजित देसाई, पु. ल. देशपांडे, विश्वास पाटील आदी लेखकांच्या खपाऊ पुस्तकांचे पायरेटिंग करण्याचा हा परप्रांतीय गुंडांचा धंदा वाढला आहे. ते प्रत्यक्ष विक्रीसाठी मराठी मुलांना समोर उभे करतात. यापुढे संबंधित विक्रेत्यांनी ध्यानात ठेवावे की, या गैरप्रकारावर आम्ही कडक पावले उचलली आहेत. संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यासाठी सर्वत्र टीम सज्ज झाल्या आहेत.. या गुन्ह्यासाठी दोन वर्षे सक्त मजुरीची शिक्षा आहे.



वाचकांना कर्णाचे जीवन समजून घेण्यासाठी 'मृत्युंजय' किंवा 'राधेय' हवी असेल, संभाजीराजांचे जीवन समजून घेण्यासाठी 'संभाजी' किंवा 'छावा' कादंबरी हवी असेल, तर अशा महापुरुषांचे जीवन समजून घेताना डुप्लिकेट पुस्तके बाळगणे योग्य आहे का? संबंधित वाचकांचे आपल्या लाडक्या श्रेष्ठ मराठी लेखकावर खरेच प्रेम आहे का? आज शिवाजी सावंत आणि रणजित देसाई यांच्या कुटुंबियांचे चरिताचे साधन त्यांच्या ग्रंथांपासून मिळणारी रॉयल्टी हेच आहे. तरी मराठी वाचकराजाने अशा गैरप्रकारांना थारा द्यावा काय?

अलीकडे काही मंडळी पीडीएफ बेकायदेशीररीत्या वितरित करत आहेत. याबाबत destinypublications91@gmail.com या संस्थेविरोधात पोलिसात रीतसर तक्रार केली आहे.

ही गुन्हेगार मंडळी कायद्याच्या कचाट्यातून वाचणार नाहीत. मग ती देशात असोत की परदेशात. त्यांना बेडी पडणारच हे संबंधितांनी लक्षात घ्यावे. याबाबत वाचकांच्या सोयीसाठी आम्ही काही गोष्टी जाहीर करत आहोत.

१) कॉपीराइट कायद्याप्रमाणे नकली पुस्तके विकणे गुन्हा आहे. स्वतःजवळ किंवा पब्लिक लायब्ररीमध्ये अशी पुस्तके आढळून आल्यास संबंधितांना गुन्ह्यामध्ये अटक होऊ शकते.
२) सार्वजनिक ठिकाणी ज्या दुकानदारांच्या पायरीवर अशी पुस्तके विकली जाऊ दिली जातात. त्या दुकानदारांचेही मुद्देमालासह चित्रीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे संबंधित दुकानदारावरसुद्धा

गुन्हा दाखल होऊ शकतो.

३) पुस्तकांच्या बेकायदेशीर पीडीएफ तयार करणे आणि त्या वितरित करणे हा कॉपीराइट कायद्यानुसार मोठा गुन्हा आहे. त्यात दोन वर्षं कैदेची तरतूद आहे .

४) ज्या ग्रुपवरून अशा पीडीएफ वितरित केल्या जातील त्यांच्यावरही गुन्हा नोंदवला जाईल. तरी त्वरित अशा पीडीएफ डिलीट करून कटू प्रसंग टाळावा.

५) ज्या निंबाळकर, पवार, पाटील आणि कुलकर्णी आडनावाच्या मंडळींनी अशा बेकायदेशीर पीडीएफ डाऊनलोड करून ग्रुपवर चढवल्या आहेत. त्यांच्याविरुद्धच्या कारवाईची लिखापढी तयार झाल्याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५) वाचकांनी अत्यंत सुमार दर्जाची ही पुस्तके विकत घेऊ नयेत. ती विकत घेतल्यावर ४ महिन्यातच त्याचे खरे काळे रंग लक्षात येतात.

६) जागृत वाचकांनीही अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी जवळच्या पोलीस स्टेशनकडे तक्रार करावी. तसेच शासनाचा या पुस्तकचोरांकडून बुडवला जाणारा महसूल वाचवावा.

७) ज्या पुस्तकांच्या दुकानात डुप्लिकेट पुस्तके आढळून येतील, त्यांना गुन्ह्यांमधील सहयोगी म्हणून कारवाईला तोंड द्यावे लागेलच. शिवाय आपल्या दुकानाच्या जागेचा उपयोग बेकायदेशीर कामासाठी केल्याबद्दल संबंधितांचे शॉप ॲक्टखालील दुकानाचे लायसन्ससुद्धा रद्द होऊ शकते, याची संबंधितांनी गंभीर नोंद घ्यावी.

८) गेल्या पिढीतील श्रेष्ठ लेखकांचा व त्यांच्या वारसदारांचा सन्मान करावा. खासगी व्यक्ती उद्योग-व्यवसाय करतात. त्याची फळे त्यांच्या वारसदारांना मिळतात. होऊन गेलेल्या या मोठ्या लेखकांनी आपले जीवन आपल्या भाषेसाठी वेचले आहे. त्यामुळे त्यांचे वारसदार त्यांच्या कष्टाची फळे खाण्यासाठी पात्र आहेत. तरी डुप्लिकेट पुस्तके करणाऱ्या या परप्रांतीय पेंढाऱ्यांना वाचकांनी अजिबात थारा देऊ नये . मायमराठीचे दालन आणि तिचे पावित्र्य जपावे.

**– विश्वास पाटील**

## एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



*पुस्तकविक्रीच्या व्यवसायात उतरल्यानंतर श्री. अनिल मेहता यांनी केवळ गाइड्स आणि पुस्तकांचा धंदा करणे हे आपलं उद्दिष्ट न ठेवता सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीला आपल्या व्यवसायाचा हातभार लागावा यासाठी प्रयत्न केला. या लेखात त्यांच्या कोल्हापूरच्या 'अजब पुस्तकालय' ते पुण्यातल्या 'मेहता पब्लिशिंग हाऊस' पर्यंतचा प्रवास आपण जाणून घेणार आहोत.*

### २.
### व्यवसाय वाढला
### पण आत्मिक समाधानाच्या शोधात...

व्याप वाढत गेला, तसा मी एकटा कमी पडू लागलो. बेळगावचा रवींद्र वर्षभरातच काही घरगुती अडचणीमुळं बेळगावला परत गेला होता. राम होता. मग प्रकाशनंतरचे माझे दोन भाऊ उल्हास व प्रदीप हे निपाणीतून येऊन मला मदत करू लागले. श्रीपाद नाईक म्हणून होते. कामासाठी माणसं मी हळूहळू वाढवत गेलो. त्यामुळं पुस्तकविक्री बरोबरच गाइड प्रकाशन व्यवसायात माझा जम चांगला बसू लागला.

आतापर्यंत अशा प्रकारचा व्यवसाय हा प्रामुख्यानं पुण्यात चालायचा. कोल्हापुरात तो अगदीच प्राथमिक अवस्थेत होता. काही प्रकाशक हा व्यवसाय करत; पण त्यांच्या महत्त्वाकांक्षा मोठ्या नव्हत्या. मला वाटतं, व्यवसायाकडं पाहण्याची माझ्याकडं एक वेगळी दृष्टी होती. कदाचित पुण्यातील शिक्षण व वाचनाची आवड यामुळं ती माझ्यात आली असेल. शिवाय तरुण असेन म्हणून असेल, पण एक प्रकारची धडाडी माझ्याकडं होती. माणसांना जोखणं, त्यांना जोडून घेणं, व्यवसायातली कौशल्यं आत्मसात करणं आणि काहीतरी वेगळं, नावीन्यपूर्ण करायचं असं सगळं मनात असायचं. त्यामुळं मी स्वस्थ बसू शकत नव्हतो. ज्यामुळं मी या व्यवसायातल्या एकेक पायऱ्या वर चढत गेलो.

मात्र मनाच्या पातळीवर मी अजूनही समाधानी नव्हतो. खरं म्हणजे केवळ गाइड्स प्रकाशित करून ती विकण्यात निश्‍चितपणे एक ठाम स्वरूपाची प्राप्ती होती. हुकमी गिऱ्हाईकही मिळत होते. घातलेलं भांडवल निघण्याची खात्रीही असायची. शिवाय इतर प्रकाशकांची पुस्तकंही मी विकत होतोच. त्यातूनही व्यवस्थित पैसे मिळत होते; पण तरीही असं वाटत होतं, की केवळ अर्थार्जन किंवा केवळ त्यासाठी गाइड व पुस्तकांचा धंदा करणं हे काही जगण्याचं उद्दिष्ट होऊ शकत नाही. त्याहीपलीकडं कुठंतरी मनाच्या, बुद्धीच्या, आत्म्याच्या पातळीवर समाधान मिळालं पाहिजे. जेणेकरून समाजात आपल्या व्यवसायाला प्रतिष्ठा मिळेल. सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीला आपल्या त्या व्यवसायाचा मोठा हातभार लागेल.

मला हळूहळू लक्षात येऊ लागलं, की पहिल्यापासूनच ललित साहित्य वाचनाची आवड असल्यामुळं माझा कल हा ललित साहित्याकडं आहे. अन् ते विश्‍व मला आता अधिक खुणावू लागलं आहे. त्याचा मी सातत्यपूर्वक विचार करू लागलो.

त्यावेळी कोल्हापुरात ललित वाङ्‌मय प्रकाशित करणाऱ्या एक-दोनच संस्था होत्या. चंद्रकांत शेटे प्रकाशन मंदिर होतं. त्यांनी नाटकं बऱ्यापैकी प्रकाशित केली होती. त्या वेळी नाटकं खेडोपाडी बसवली जायची. रणजित देसाई, आनंद यादव, बाबा कदम, प्र. के. अत्रे यांसारख्या भल्याभल्यांची पहिली पुस्तकं त्यांनी प्रकाशित केली होती; पण ती पुस्तकं फारशी विकली गेली नव्हती. त्यांना वितरण जमत नसावं, असं मला वाटतं. मला मात्र आतापर्यंतच्या अनुभवातून मार्केटिंगची कला व तंत्र या दोन्ही गोष्टी बऱ्यापैकी

अवगत झालेल्या होत्या. ललित साहित्याच्या या क्षेत्रात आपण वेगळेपणानं व उत्तम काम करू शकतो, असं आतलं मन सांगू लागलं होतं. सुरुवात तरी करून पाहूया. एखादं ललित पुस्तक प्रकाशित करून तरी पाहूया, असं सारखं वाटू लागलं.

त्या वेळी माझ्या दुकानात बापूसाहेब गावडे नावाचे एक गृहस्थ येत असत. माझे चुलत भाऊ बी. के. शहा यांच्यामुळं त्यांची व माझी ओळख झाली होती. कोल्हापूर-पुणे हायवेवर त्यांचं एक हॉटेल होतं. चोवीस तास ते चालू असायचं. 'पिंजरा' या चित्रपटात त्यांनी एक लहानसं काम केलं होतं. चित्रपट व नाट्य क्षेत्रातील लोकांशी त्यांचा संबंध होता. कलाकार मंडळी त्यांच्या हॉटेलवर जेवायला येत. त्यामुळं कलाकारांबद्दलचे किस्से ते मला ऐकवत. त्यांचं साहित्याचं वाचनही चांगलं होतं. गिऱ्हाईक नसले की ते वाचन-लेखन करत. वाचलेल्या कथा ते मला सांगत, अगदी जशाच्या तशा. मला असं वाटायचं, की हा माणूस जणू काही पुस्तकच वाचत आहे.

एकदा मी त्यांना विचारलं, ''तुम्ही स्वतःचं काही लेखन केलेलं आहे का ?''

त्यावर ते म्हणाले, ''हो. 'दसऱ्याचं सोनं' नावाचं पुस्तक लिहून तयार आहे.''

मला आश्चर्य वाटलं. मी उत्सुकतेनं ते लगेच त्यांच्याकडून मागवून घेतलं व वाचून काढलं. मला ते अतिशय आवडलं आणि मी ते प्रकाशित करायचं धाडस करायचं ठरवलं.

१९७३ हे ते साल होतं. मी कोल्हापुरातच पुस्तकाचं प्रिंटिंग केलं; पण पुस्तकाच्या मुखपृष्ठासाठीची चाररंगी छपाई इथं नव्हती. त्यासाठी वेगवेगळे चार ब्लॉक्स असायचे. ते चार वेळा वेगवेगळे छापावे लागत. माझ्या वडलांनी मुंबईला जाऊन ब्लॉक्स आणले. मग मी ते पुस्तक संपूर्णपणे कोल्हापुरातच छापून घेतलं.

हे पुस्तक बऱ्यापैकी विकलं गेलं. जिल्हा परिषदेनं या पुस्तकाच्या तीनशे प्रती घेतल्या; पण त्यातून या पुस्तकासाठी मी घातलेले पैसे फक्त निघाले. अजूनही प्रती शिल्लक होत्या. मुंबई, पुण्यातील विक्रेते आता ओळखीचे झाले होते. त्यातील एका प्रकाशकानं ललित पुस्तकं जिथं हमखास विकली जातात, त्या पुस्तक विक्रेत्यांची नावं मला सांगितली. तो म्हणाला, ''मुंबईला बॉम्बे बुक डेपो आणि आयडीयल बुक कंपनी आहे, तिथं दे.'' मी तसं केलं.

त्या वेळी पुस्तक विक्रेत्यांकडं उधारीनं पुस्तकं ठेवली, तरी त्या पुस्तकांचे पैसे वेळेवर मिळतीलच याची खात्री नसायची. त्या विक्रेत्याच्या मर्जीवर ते अवलंबून असायचं; परंतु तरीही या पुस्तकाच्या हजार प्रती विकल्या गेल्या. त्यासाठी वेगळं असं वितरणकौशल्य वापरावं लागलं नाही. ती सर्वच पुस्तकं दीड-दोन वर्षांत विकली गेली. आमच्याकडून अनेक ग्रंथालये पुस्तकं खरेदी करत. त्यांच्याकडूनही या पुस्तकाला चांगली मागणी आली.

मी प्रकाशित केलेल्या या पहिल्याच ललित स्वरूपाच्या पुस्तकाच्या यशाचा हा अनुभव माझ्यासाठी अतिशय आनंददायी व आत्मविश्वास वाढवणारा होता. त्यामुळं मी हळूहळू गाइड प्रकाशित करणं बंद केलं आणि ललित साहित्याकडं वळलो. यात मला खरोखरच समाधान वाटत होतं.

सुरुवातीला मी कोल्हापुरातील व आसपासच्या भागातील शरद वराडकर, शंकर खंडू पाटील, ल. गो. पंडितराव, चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे या लेखकांची पुस्तकं प्रकाशित केली. तसेच मला नाटकांविषयी प्रेम होतं. त्यामुळं मी मला आवडलेली नाटकं प्रकाशित केली. एकदा तर मी आ. दे. पाटील यांची एकाच वेळी दहा नाटकं प्रसिद्ध केली होती. त्या वेळी तर नाटकांची पुस्तकं काढण्याचं मला एक वेडच लागलं होतं. त्या वेळी त्याला मागणीही असायची. ग्रामीण भागात नाटकं किंवा एकपात्री नाटकांचे प्रयोग बऱ्याच ठिकाणी व्हायचे. गावागावांमध्ये जत्रेच्या वेळी नाटकांच्या स्पर्धा असत. त्या काळात रामकृष्ण बुक डेपो तर्फेही नाटकं प्रकाशित व्हायची. परचुरे प्रकाशन मंदिरतर्फेही आचार्य अत्रेंची नाटकं प्रकाशित व्हायची; पण बऱ्याचवेळा मी असं बघितलं की, नाटकाचं वेड ग्रामीण भागात किंवा महाराष्ट्राच्या बाहेर गोव्यामध्ये खूप होतं. विशेषतः कोकणात; पण त्यांची एकच अडचण असायची आणि ती म्हणजे स्त्री पात्राची. एक स्त्री पात्र असलेल्याच नाटकांची मागणी असायची आणि तेच प्रयोग ग्रामीण किंवा कोकणात केले जायचे. (पुढं ९०-९५मध्ये मी नाटकं प्रकाशित करायची थांबवली; कारण ती जातच नव्हती. आजही नाटकं येतात; पण खपतात कमी.) नाटकांच्या या आवडीमुळं मी रात्रीचा प्रवास करून मुंबईला जायचो. नवीन नाटक ज्यांचं लागलं असेल, त्यांना शोधायचो आणि त्यांची पुस्तकं प्रकाशित करायचो.

पण, म्हणावं तसं यश अजून मला मिळायचं होतं. या क्षेत्रात मला कोणताही गुरू नव्हता. माझे मीच प्रयोग करत होतो, प्रयत्न करत होतो.

शिकत होतो. अर्थात माझं शिकणं हे अनुभवातलं होतं आणि मला भेटलेल्या माणसांकडूनही मी काही ना काही शिकतच होतो. मग ती माणसं म्हणजे माझ्या दुकानात काम करणारा सेवकवर्ग असो किंवा माझे सहकारीही होते.

त्या वेळी रोहिणी लिमये नावाची एम. कॉम झालेली एक मुलगी माझ्याकडं कामाला होती. ती अकाउंट बघायची. ती अतिशय चांगली वाचक होती. तिच्या असं लक्षात आलं की, हा माणूस खूप धडपड करतो. वाचनही भरपूर करतो; पण याच्याकडं चांगले लेखक नाहीत. ती मला नेहमी मराठीतल्या त्या वेळच्या प्रसिद्ध लेखकांबद्दल विचारायची. तुम्ही 'वपुं'चं हे पुस्तक वाचलं का? शान्ता शेळकेंचं हे हे पुस्तक वाचलं का? वगैरे. मला त्या पुस्तकांची नावं माहीत असायची; पण मी ती वाचलेली नसायची. ती मला सुचवायची की तुम्ही हे वाचा, ते वाचा. तिच्या आणखी दोघी मैत्रिणी होत्या. विजू घाटे व वैजयंती अग्निहोत्री. याही दोघी नंतर दुकानात कामाला लागल्या होत्या. त्याही चांगल्या वाचक होत्या. त्यामुळं मग त्या तिघी मिळून मला सतत टोचणी देत, की मोठे लेखक मिळवा. त्यांची पुस्तकं प्रकाशित करा. त्यामुळं मी मोठ्या लेखकाचा शोध घेऊ लागलो.

त्या वेळी नुकतीच एक कादंबरी आली होती, 'तीन तरुणी - दोन तरुण आणि एक बंड.' त्याचे लेखक होते भा. ल. पाटील. ती कादंबरी मोठी व नवा विषय असणारी होती. ते पुस्तक मी वाचून काढलं. मला ते आवडलं. एक दिवस मनात येताच मी मुंबईला सरळ भा. ल. पाटील यांच्याकडं गेलो व त्यांच्याकडून 'जगावेगळी' नावाचं एका अनाथ मुलीवरचं नवं पुस्तक मिळवूनच आलो. एवढ्या मोठ्या लेखकाचं पुस्तक आपण प्रकाशित करत आहोत, हे समजताच आमच्या या सगळ्या स्टाफला अतिशय आनंद झाला आणि मुंबईतला लेखक म्हटल्यावर तर तो आनंद वेगळाच होता.

त्या वेळी आनंद यादव यांचं नावही साहित्य वर्तुळात गाजत होतं. मराठी साहित्य क्षेत्रात 'गोतावळा' ही त्यांची कादंबरी 'मैलाचा दगड' ठरली होती. मी ठरवलं, की आपण त्यांची भेट घ्यायचीच.

खरं म्हणजे त्यांची व माझी मैत्री कॉलेज वयापासूनची; पण कॉलेज संपल्यानंतर ते त्यांच्या नोकरीत व्यस्त, तर मी माझ्या व्यवसायात. आमचा संपर्क तुटला होता. ते पुण्यात शाहू महाविद्यालयात प्राध्यापक होते. मी पुण्यात जाऊन त्यांना भेटलो आणि गप्पांच्या ओघात विषयाला हात घातला.

''यादव, मी सध्या ललित साहित्याची स्वतंत्र पुस्तकंही प्रसिद्ध करतो

आहे. कोल्हापुरातील अनेक लेखकांशी माझा परिचय झाला आहे. त्यांची काही पुस्तकं मी प्रसिद्ध केली आहेत. अजूनही काही हस्तलिखितं माझ्याकडं आहेत.''

असं म्हणून त्यांना मी प्रकाशित केलेली काही पुस्तकं दाखवली. भा. ल. पाटील यांचीही कादंबरी दाखवली.

''वा ! हे तुम्ही छान सुरू केलं. कोल्हापुरात सध्या तरी नव्या दमाचा कुणी प्रकाशक नाही. तुम्हाला चांगला वाव आहे या क्षेत्रात. चालू ठेवा.'' एक मित्र म्हणून मला काही प्रोत्साहन द्यायचं, म्हणून ते बोलले. माझ्या ते लक्षात आलं.

मी त्यांना म्हणालो, ''ते ठीक आहे; पण मला तुमची पुस्तकं प्रकाशनासाठी हवी आहेत. त्यासाठी मी बोलतोय.''

अचानकपणे माझा असा प्रस्ताव त्यांना अनपेक्षित होता; कारण त्यांची पुस्तकं ते मुंबईतील मौज प्रकाशनाकडं देत होते. त्यांना अकारण प्रकाशक बदलण्याचं काहीच कारण नव्हतं. शिवाय मौज प्रकाशन मान्यवर व प्रतिष्ठित होतं आणि मी या व्यवसायात नवीन होतो.

ते गंभीर झाले. थोडा वेळ गप्पही बसले; पण त्यांना निर्णय घ्यावाच लागणार होता. आणि तो घेताना त्यांनी मैत्री महत्त्वाची मानली.

''खरंच, तुम्हाला माझी पुस्तकं हवी आहेत ?'' त्यांनी मला विचारलं.

''मग काय गंमत करतोय का काय तुमची ?'' मी म्हणालो.

त्यावर ते हसले.

''तसं नाही. काही गोष्टी स्पष्ट बोलल्या पाहिजेत. त्या प्रकाशक म्हणून तुमच्या हिताच्या आणि लेखक म्हणून माझ्या फायद्याच्या आहेत.''

''मग तर बोलाच. अगदी स्पष्टपणे बोला.'' मी म्हणालो.

''राग मानणार नाही ? गैरसमज होणार नाही ?''

''मुळीच नाही.''

प्रकाशन व्यवसायातच तुम्हाला मनापासून रस असेल आणि माझी पुस्तकंही तुम्हाला प्रसिद्ध करायची असतील, तर प्रथम दोन गोष्टी कराव्या लागतील. ''

''कोणत्या ?''

''एक तर तुमच्या प्रकाशनाला 'अजब पुस्तकालय' हे नाव नको. दुसरी गोष्ट म्हणजे हा व्यवसाय तुम्ही पुण्यात सुरू करावा, असं मला वाटतं.''

''कारण ?''

''कारण असं की 'अजब पुस्तकालय' हे प्रकाशनाचं नाव आता प्रामुख्यानं 'गाइड' प्रकाशित करणाऱ्या प्रकाशनाचं नाव म्हणून लोकांच्या मनात पक्कं झालेलं आहे. आणि 'गाइड' तुम्ही कितीही प्रसिद्ध केले तरी प्रकाशन व्यवसायात तुम्हाला प्रतिष्ठा मिळणार नाही, असं मला वाटतं. आज तरी महाराष्ट्रात 'चांगलं प्रकाशन' हा व्यवसाय आहे. त्याला केवळ धंद्याचं स्वरूप नाही. त्याला समाजाच्या सांस्कृतिक जीवनात स्थान असतं. म्हणून नवं काहीतरी नाव द्या आणि गाइडांसाठी फार तर 'अजब पुस्तकालय' हे नाव वापरत राहा

''दुसरी गोष्ट अशी की, पुण्यात किंवा मुंबईत छपाईचं आणि पुस्तकाच्या स्वरूपाचं तंत्र फारच पुढं गेलेलं आहे. कोणत्या पुस्तकाला कोणता टाइप वापरावा, मांडणी अधिकाधिक सुबक, सुंदर, सुसंगत कशी करता येईल इत्यादीचं तंत्र पुण्यात अतिशय प्रगत स्वरूपात आहे. चित्रकार, मुद्रित तपासणारे, छापखाना असलेले पुष्कळ लोक पुण्यात आहेत. त्यांच्यात स्पर्धा आहे. म्हणून उत्तम गुणवत्ता आपणास मिळू शकते. तुम्ही पुण्यात यावं, असं मला वाटतं, आणि पुस्तकांसाठी साहित्यिक वातावरण पुण्यात आहे. तिथंच प्रकाशन संस्थेचा खरा विकास होईल. आणि असं पाहा; माझ्यासारख्या कोणत्याही लेखकाला असंच वाटणार ना, की आपल्या पुस्तकांची निर्मिती उत्तम असावी. याबाबतीत गेली काही वर्षं मी पुण्यामुंबईचा अनुभव घेतला आहे. म्हणून मी हे बोलतो आहे, गैरसमज करून घेऊ नका.''

आनंद यादवांनी त्या वेळी जो काही आपला स्पष्ट विचार मांडला तो फारच महत्त्वाचा होता. म्हणजे तो माझ्या आतापर्यंतच्या व्यावसायिक कारकिर्दीला पूर्णपणे नवं वळण देणारा ठरू शकेल असाच विचार होता. तशी शक्यता तरी मला दिसत होती. प्रकाशन क्षेत्रात पुढं जायचं म्हणतोच आहोत, तर जिथं या क्षेत्राची खरी बाजारपेठ आहे तिथंच जायला हवं. हरकत काय आहे नं हेही करून बघायला? मला त्यांचं म्हणणं पूर्णपणे पटलं आणि तत्क्षणी मी निर्णय घेऊन टाकला, की ही नवी उडीसुद्धा आपण घ्यायची. जर मला या क्षेत्रात नवीन काही वेगळं व भरीव असं समाधान देणारं काम करायचं असेल, तर हे धाडस केलंच पाहिजे.

मी आनंद यादवांना म्हणालो, ''गैरसमज मुळीच होणार नाही. पुण्यात प्रकाशन मी सुरू केलं, त्याला नवं नाव दिलं, असं समजा. तुमच्या पुस्तकाचं

हस्तलिखित फक्त तयार ठेवा.''


उन्हाळ्याच्या सुट्टीत आमची ही बोलणी झाली आणि दिवाळीच्या सुट्टीत १९७६मध्ये पुण्यात मी नव्या प्रकाशन संस्थेचा शुभारंभ केला. नाव 'मेहता पब्लिशिंग हाऊस.' त्या वेळी व आताही बऱ्याच मराठी प्रकाशन संस्थांची नावं ही मराठीतून असतात; पण मी इंग्रजीतून संस्थेचं नाव दिलं. पुढं-मागं ही संस्था राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत गेली पाहिजे हा विचार त्यामागं होता. सुरुवातीला पत्ता तात्पुरता एका मित्राचा; कारण पुण्यात स्वतःची जागा नव्हती. नंतर अनेक खटपटी केल्यानंतर सदाशिव पेठेत चित्रशाळेत एक फ्लॅट मिळाला. हा फ्लॅट अगदीच छोटा व तिथं प्रकाशाचीही कमतरता होती; मात्र त्या जागेमुळं प्रकाशन संस्थेचा बोर्ड व पत्ता लावायला मदत झाली. पुढं तीन-चार वर्षांनंतर सदाशिव पेठेतच धनश्री अपार्टमेन्टमध्ये जरा अधिक मोठ्या जागेत ऑफिस थाटलं.

पुण्यात ऑफिस केलं म्हटल्यावर आनंद यादवांनी कबूल केल्याप्रमाणं मला त्यांचा विनोदी कथासंग्रह 'माळावरची मैना' हे पहिलं पुस्तक दिलं. पुण्यातील पुष्पक प्रकाशनाचे श्री. निपुणगे हे माझे चांगले मित्र झाले होते. त्यांनी पुण्यातील आमच्या या पहिल्यावहिल्या पुस्तकाच्या निर्मितिप्रक्रियेत खूप मदत केली.

त्यानंतर हळूहळू नवनवीन पुस्तकं प्रकाशित करू लागलो. त्या वेळी ऑफिसमध्ये कामासाठी निपाणीचा ढणाल नावाचा मुलगा होता. नंतर मनोहर म्हणून होता. त्यानंतर मी या क्षेत्रातील पुण्यातील काही उत्तम माणसं हेरून मिळवली. रेखा हर्डीकर, रोहिणी लिमये पुस्तकांचा आर्थिक व्यवहार, खरेदी-विक्री, व्यवस्थापन इत्यादी कामं पाहत होत्या आणि त्यांच्या जिवावर मी निर्धास्त राहत होतो. येणाऱ्या-जाणाऱ्या ग्राहकांना त्या पुस्तकाची उत्तम माहिती देऊन यशस्वीपणे व्यवहार करत होत्या. श्री. रवींद्र गुर्जर यांचीही मला खूप मदत झाली. ही मंडळी पुण्यातील प्रकाशन व्यवहार विश्वासानं सांभाळू लागली, त्यामुळं मला कोल्हापुरातील दुकानही सांभाळता येत होतं. आठवड्यातून दोन-तीन दिवस मी पुण्यात राहत असे. मग दुकानासाठी लागणारी खरेदी करून कोल्हापूरला परतत असे.

(क्रमशः)

## पुस्तक परिचय




# क्रांतिसिंह नाना पाटील

■

संपादक

**डॉ. जयसिंगराव पवार**

■

क्रांतिसिंह नाना पाटील यांचे जीवन, कार्य, त्यांची भाषणे व लेख, तसेच आठवणी यांवर आधारित द्विखंडात्मक ग्रंथ

'क्रांतिसिंह नाना पाटील' हे पुस्तक डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केले आहे. त्यामध्ये त्यांना सौ. वसुधा ज. पवार, डॉ. दिनकर पाटील, डॉ. जे. के. पवार यांनी संपादन-साहाय्य केले आहे. नाना पाटील यांचे घराणे वारकरी संप्रदायातील असल्यामुळे बारशाच्या दिवशीच आजीने त्यांच्या गळ्यात तुळशीची माळ घातली. नाना पाटील यांचे मूळ गाव येडे मच्छिंद्र; तेथेच त्यांचे सातवीपर्यंत शिक्षण झाले. त्यानंतर ते तलाठी झाले. लहानपणापासून त्यांना सामाजिकतेची जाण व गोरगरिबांविषयी विशेष कळवळा होता किंबहुना गरिबांच्या कल्याणाची तळमळ हेच त्यांच्या जीवनकार्याचे सूत्र होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा वारसा पुढे चालवायचा असेही त्यांच्या मनात होते. ते महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीतही सहभागी होत असत. १९४२ मध्ये म. गांधींनी इंग्रजांना 'चले जाव'चा इशारा दिला तर भारतीय जनतेला स्वातंत्र्यासाठी 'करेंगे या मरेंगे।' असे आवाहन केले. सातारा जिल्ह्यातील नाना पाटील यांनी त्यापासून प्रेरणा घेऊन तलाठ्याची नोकरी सोडून काँग्रेस पक्षात सामील होऊन स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिले. इंग्रज सरकारविरुद्ध बंड पुकारल्यामुळे अनेक वेळा त्यांना तुरुंगवास सोसावा लागला. मग त्यांनी सुमारे चार वर्षे भूमिगत राहून आपले कार्य सुरू ठेवले. स्वातंत्र्यासाठी निष्ठेने काम करणारे अनेक विश्वासू सहकारी मिळवून त्यांनी सातारा जिल्ह्यात प्रति-सरकार (पत्री सरकार) स्थापन केले आणि त्यामार्फत महात्मा गांधींच्या मनातील ग्रामराज्याचा प्रयोग राबवून लोकहिताची अनेक कामे केली. सातारा जिल्ह्यातले प्रति-सरकार भारतीय स्वातंत्र्य चळवळीतले एक खास पान ठरले ते क्रांतिसिंहांच्या पराक्रमामुळेच! ऑगस्ट १९४७ मध्ये भारताला स्वातंत्र्य मिळाले. मात्र, त्यानंतर काँग्रेसमधील अनेक नेते व कार्यकर्ते सरकार आणि सत्तेच्या मागे लागले; त्यामुळे नाना पाटील यांचा सुराज्य स्थापन होण्यासंदर्भात भ्रमनिरास झाला. क्रांतिसिंह नानांच्या जीवनकार्याचे मूळ सूत्र गोरगरीब, शेतकरी व कामगार यांच्यावरील शतकानुशतकाची राजकीय, सामाजिक, आर्थिक व मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी आणि त्यांचे जीवन सुखी करण्यासाठी धडपडणे हे होते. साहजिकच त्यांनी शेतकरी व कामगार पक्षात प्रवेश करून आपले कार्य पुढे सुरू ठेवले. पुढे ते मार्क्स-लेनिन-स्टॅलिनच्या मार्गाकडे वळून कम्युनिस्ट पक्षात गेले, कारण गोरगरिबांना सुखाचे दोन दिवस व घास मिळावेत ही त्यांची एकच आंतरिक

तळमळ होती; त्यामुळे महाराष्ट्रातल्या गरीब आणि श्रमजीवी जनतेला नाना पाटलांचा मोठा आधार वाटत असे. जनतेचा कोणताही लढा असो; त्या लढ्यात नाना अग्रभागी नाहीत असे कधीही व्हावयाचे नाही आणि हेच त्यांच्या अफाट लोकप्रियतेचे रहस्य आहे. लोकांतील भोळसटपणा दूर व्हावा, साक्षरता वाढावी यासाठी नानांनी मनःपूर्वक कार्य केले; त्यासाठी ते गावोगावी जाऊन भाषणे देत असत. त्यांच्या भाषणात ते लोकांच्या नित्य परिचयाची, व्यवहारातली उदाहरणे लोकांच्याच भाषेत देऊन आपला मुद्दा पटवून देत असत; त्यामुळे त्यांचे भाषण ऐकण्यासाठी हजारो लोक गर्दी करीत आणि आपोआप अपेक्षित परिणाम साधला जात असे. साधी भाषा, साधी राहणी आणि प्रत्यक्ष कार्यात आनंद मानणे ही जीवनसूत्री पाळण्यात त्यांचे खरे जीवन होते.

थोर स्वातंत्र्यसेनानी व प्रति-सरकारचे (पत्री सरकार) संस्थापक आणि ग्रामराज्याचा प्रयोग राबवणारे क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केलेल्या कार्याची ओळख आजच्या तरुण पिढीला, विद्यार्थीवर्गाला होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने नाना पाटील यांचे जीवन व कार्याचा सविस्तर परिचय करून देणारा हा ग्रंथ आदर्श आहे.


**डॉ. जयसिंगराव पवार यांचे**
**आम्ही प्रकाशित केलेले इतिहासविषयक ग्रंथ**

- राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे
- आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध
- शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे?
- राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे
- राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा
- राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे
- राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे
- शिवछत्रपती : एक मागोवा
- मराठेशाहीचे अंतरंग
- छत्रपती संभाजी : एक चिकित्सा
- मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध

८वी आवृत्ती




मानवी स्वभावाच्या
बऱ्या-वाईट कंगोऱ्यांचे दर्शन
रंजकतेनं घडविणाऱ्या कथा

# तीन हजार टाके

सामान्य व्यक्ती... असामान्य जीवन...

**सुधा मूर्ती**

अनुवाद : **लीना सोहोनी**

पृष्ठसंख्या: १६० । किंमत: १७०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

८वी आवृत्ती





बकुळीच्या साक्षीने जन्मलेली
श्रीमती आणि श्रीकांत यांची
अनोखी प्रेमकहाणी...

# बकुळा

**सुधा मूर्ती**

अनुवाद : **लीना सोहोनी**

पृष्ठसंख्या: १४८ । किंमत: १५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध





# समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती

**डॉ. जयसिंगराव पवार**

राजर्षी शाहू महाराजांची कारकीर्द आणि त्यांच्या कार्याच्या ऐतिहासिक विश्लेषणावर अधिक भर देणारे शाहूचरित्र

'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती' या पुस्तकाचे लेखन व संपादन डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले आहे. पवार यांचे पुस्तक शाहू महाराजांचे जीवनचरित्र आणि कार्याचा सविस्तर परिचय करून देणारे आहे. हे शाहूचरित्र इतर शाहूचरित्रांप्रमाणे केवळ त्यांच्या कारकिर्दीचा वर्णनात्मक वृत्तान्त देणारे नसून त्यामध्ये शाहू महाराजांच्या कार्याच्या ऐतिहासिक विश्लेषणावर अधिक भर दिला आहे. फुले-शाहू-आंबेडकर या तीन महापुरुषांचे विचार आणि कार्य हा सामाजिकदृष्ट्या एक अखंड प्रवाह आहे. अज्ञानाने काळवंडून गेलेले आणि दारिद्र्याने गांजून गेलेले सर्वसामान्य लोकांचे जीवन ज्ञानाने उजळून निघावे आणि ते समृद्धीने बहरून यावे, यासाठी शाहू महाराजांनी आयुष्यभर जो संघर्ष केला, तो विधायक पद्धतीने येथे शब्दबद्ध केला आहे. शाहू महाराजांसारख्या कर्तृत्ववान राजाच्या व्यक्तिमत्त्वाला विविध पैलू होते. अस्पृश्यता निवारण, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, वसतिगृहांची स्थापना, दुष्काळ व साथीच्या रोगांवर केलेली मात, मुलींचे शिक्षण, आंतरजातीय विवाहास मान्यता देण्याचा कायदा, फासेपारधी वगैरेंचे पुनर्वसन, जलसंधारण, चहा-कॉफी व सुगंधी वनस्पतींची लागवड इत्यादी अनेक प्रकारे सामाजिक जीवनाच्या असंख्य क्षेत्रांमध्ये राजर्षी शाहूंनी काळाच्या पुढे पावले टाकली होती. दीन-दलित आणि शेतकरी-कष्टकरी यांच्या उद्धारासाठी हे सर्व समाजकार्य ते सद्विचाराने, मनःपूर्वक करत होते. किंबहूना तेच त्यांचे जीवनध्येय होते. मग त्यामध्ये वेळोवेळी येणाऱ्या अडचणी, हितसंबंधितांकडून होणारा विरोध, राजकारणामुळे होणारे आरोप-प्रत्यारोप यांची पर्वा न करता खंबीरपणे, कुठेही कटुता न येऊ देता ते तडीस नेत असत. ते ब्रिटिशांच्या काळात कोल्हापूर संस्थानचे राजे होते; त्यामुळे साहजिकपणे त्यांच्यावर काही मर्यादा होत्या; पण शाहू महाराज मर्यादांचे उल्लंघन न करता त्यांना अपेक्षित असलेल्या सुधारणा घडवून आणत होते. आपल्या संस्थानात हिंदू-मुस्लीम समाजात ऐक्यभाव व प्रेमभाव निर्माण व्हावा म्हणून शाहू महाराजांनी अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम योजिले. त्यांनी हिंदूंच्या काही देवस्थानांच्या उत्पन्नाचा काही भाग मुस्लीम देवस्थानांसाठी तर प्रार्थनास्थळांच्या (दर्गा, मशिदी) उत्पन्नाचा काही भाग हिंदू देवस्थानांसाठी लावून दिला होता. या पुस्तकात शाहू महाराजांच्या चरित्रातील अशा असंख्य घटना नमूद केल्या आहेत. आपल्या प्रजाजनातील प्रत्येक व्यक्तीला उन्नत करण्याची तळमळ लागलेल्या या महापुरुषाचे चरित्र नव्या पिढीला सतत उंच झेप घेण्याची प्रेरणा देत राहील.

**पुस्तक परिचय**




# छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ

संपादक
**डॉ. जयसिंगराव पवार**


*संभाजीराजांचं विपरीत चित्र रेखाटणाऱ्या ऐतिहासिक साधनांचं खंडन करत त्यांच्या पराक्रमाची, धाडसाची लिहिलेली अपूर्व गाथा*

संभाजीराजे हे शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र आणि मराठी स्वराज्याचे दुसरे छत्रपती. अपुऱ्या आणि चुकीच्या ऐतिहासिक साधनांमुळे संभाजीराजांची प्रतिमा डागाळलेल्या स्वरूपात

समोर आली. संभाजीराजे हे व्यसनी, स्त्रीलंपट, क्रूर आणि बेजबाबदार होते, असं चित्र या चुकीच्या साधनांमुळे निर्माण झालं; पण कालांतराने काही असेही पुरावे उपलब्ध झाले, ज्या पुराव्यांमुळे संभाजीराजांवरील आरोपांमध्ये तथ्य नव्हतं, हे सत्य समोर आलं. तर इतिहासकारांनी, नाटककारांनी, साहित्यिकांनी, ललित लेखकांनी जुन्या-नव्या साधनांच्या आधारे संभाजीराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा घेतलेला वेध, त्यातून होणारं संभाजीराजांचं दर्शन आणि त्यांच्या व्यक्तिचित्रणातील सत्यासत्यता याची सविस्तर आणि ससंदर्भ चर्चा करणारं पुस्तक आहे 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ.' संभाजीराजांचं दिलेरखानाला जाऊन मिळणं... नंतर परत येणं... शिवाजी महाराजांची आणि त्यांची भेट होणं... त्यानंतर नजीकच्या काळात शिवाजीराजांचा झालेला मृत्यू... शिवाजीराजांचं मंत्रीमंडळ आणि सोयराबाई यांनी पन्हाळगडावर असलेल्या संभाजीराजांना कैद करून राजारामला गादीवर बसवण्याचा केलेला कट... सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या मुत्सद्दीपणामुळे आणि स्वामिनिष्ठेमुळे तो कट अयशस्वी ठरणं... त्यानंतर रायगडावर झालेला संभाजी महाराजांचा राज्याभिषेक... मंत्रिमंडळातील गद्दारांना माफ करून परत एकदा संभाजीराजांनी त्यांना मंत्रिमंडळात दिलेलं स्थान... त्यानंतरही त्यांनी संभाजीराजांवर विषप्रयोग करण्याचा केलेला प्रयत्न निष्फळ ठरणे... परिणामी, आण्णाजी दत्तो, बाळाजी आवजी इत्यादींना संभाजीराजांनी ठोठावलेली देहान्ताची शिक्षा... संभाजीराजांनी मोगलांशी, जंजिऱ्याच्या सिद्दीशी, पोर्तुगीजांशी दिलेला लढा... संगमेश्वर येथे मुकर्रबखानाने संभाजीराजे आणि कवी कलश यांना केलेली अटक...औरंगजेबाच्या समोर संभाजीराजांना उभं केलेलं असतानाचं संभाजीराजांचं बाणेदार वर्तन...औरंगजेबाने संभाजीराजांसमोर धर्मांतराचा ठेवलेला प्रस्ताव आणि संभाजीराजांनी त्याला दिलेलं सडेतोड उत्तर...संभाजीराजांना अपमानास्पद आणि क्रूर वागणूक देऊन अखेर औरंगजेबाने निर्घृणपणे केलेला त्यांचा वध... या घटनांचं ससंदर्भ विश्लेषण या पुस्तकात करण्यात आलं आहे.गोदावरी आणि थोरातांची कमळा या दोन स्त्रियांशी संभाजीराजांचा काल्पनिक संबंध जोडून संभाजीराजांच्या चारित्र्यावर उडवले गेलेले शिंतोडे, शिवाजी महाराजांबद्दल आणि सोयराबाईंबद्दल संभाजीराजांच्या मनात आकस होता, कवी कलशामुळे संभाजीराजे शाक्तपंथाच्या आहारी गेले होते, संगमेश्वर येथे अनुष्ठानात दंग असल्यामुळे संभाजीराजे पकडले गेले, संगमेश्वर येथे संभाजीराजांनी वरातीतून एका वधूचे अपहरण केले होते आणि तिच्याबरोबर प्रणयक्रीडा करत असताना मोगलांनी त्यांच्यावर झडप घातली असे काही प्रवाद संभाजीराजांच्या चरित्रात शिरले होते. त्या प्रवादांचं पुराव्यासहित खंडन करण्याचा प्रयत्न या पुस्तकातून केला गेला आहे.

संभाजीराजांचे गुण अधोरेखित करणारं हे पुस्तक आहे.

## पुस्तक परिचय




# वेध अमुच्या इतिहासाचा

संपादक

**डॉ. मंजुश्री पवार**

**डॉ. अवनीश पाटील**

*ख्यातनाम इतिहाससंशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या गाजलेल्या निवडक प्रस्तावना लेखांचा संग्रह*

इतिहासात घटना घडतात. त्याची नोंद समकालीन साधनांत होते. त्या नोंदींची नंतर चिकित्सा करून त्या घटना, कालखंड वा व्यक्तीचा इतिहास लिहिला जातो. मग त्या

इतिहासाचे विश्लेषण करून त्यावर भाष्य केले जाते. त्या भाष्याचाही लेखाजोखा मांडला जातो. भाष्य करणाऱ्याच्या भूमिकेची समीक्षा केली जाते. अशी ही लांबच लांब साखळी म्हणजे, भूतकाळातील घटना घडल्यापासून ते वर्तमानातील समाजाच्या धारणेपर्यंत व आकलनापर्यंत अखंड चाललेली शोधयात्रा असते. अशाच एका शोधयात्रेतील शेवटची कडी म्हणजे डॉ. जयसिंगराव पवारांच्या विविध ग्रंथांच्या प्रस्तावनांची ही प्रस्तावना होय.

डॉ. जयसिंगराव पवारांच्या लेखणीने गेली पाच दशके मराठेशाहीपासून ते आधुनिक महाराष्ट्राच्या कालखंडापर्यंत अनिरुद्ध संचार केला आहे. महाराष्ट्रात इतिहास संशोधकांच्या अनेक पिढ्या निर्माण झाल्या. सत्तरच्या दशकानंतर यांतील काही संशोधकांनी प्रस्थापित इतिहासाचे पुनर्लेखन करण्यावर भर दिला आणि इतिहासलेखनाचे राष्ट्रवादी, वर्णनात्मक व जातीय श्रेष्ठत्वाने ग्रासलेले स्वरूप बदलले.

या संशोधकांमध्ये डॉ. जयसिंगराव पवारांचे नाव अग्रक्रमाने घेता येईल. डॉ. अप्पासाहेब पवार, वा.सी. बेंद्रे, न.र. फाटक, ग.ह. खरे, द.वा. पोतदार यांच्या उतरत्या वयात डॉ. पवारांचा एक सत्यान्वेषी तरुण इतिहास संशोधक म्हणून उदय होत होता. त्या काळात त्यांना पूर्वाश्रमीच्या संशोधकांनी हाताळलेले छत्रपती शिवाजा व छत्रपती संभाजी महाराजांसारखे विषय, तर महाराणी ताराबाई, सेनापती संताजी घोरपडे यांसारखे पूर्णपणे अस्पर्श व दुर्लक्षित विषय खुणावत होते. कधी कधी इतिहासातील काही व्यक्तिरेखा समर्थपणे प्रकटण्यासाठी वस्तुनिष्ठ संशोधनाच्या स्पर्शाची वाट पाहत असतात. चिकित्सक वृत्तीनं आणि शुद्ध भावनेनं त्याला हाताळणाऱ्या संशोधकांचीही ते वाट पाहत असतात. अशा संशोधनाचा स्पर्श झाला, की ती व्यक्तिरेखा प्रकटते.

तसंच काहीसं डॉ. पवारांच्या महाराणी ताराबाई, छत्रपती राजाराम व सेनापती संताजी घोरपडे या चरित्रांचं झालं आहे. ही त्यांनी लिहिलेली तीनही चरित्रं महाराष्ट्रातील पहिली आणि एकमेव संशोधनात्मक चरित्रं ठरली आहेत. डॉ. पवारांनी आपल्या छत्रपती संभाजी महाराज ग्रंथातून वा. सी. बेंद्रे व कमल गोखलेंपेक्षा वेगळा स्वातंत्र्यप्रिय संभाजी उभा केला. इतिहासकार हा अनेकदा एखाद्या ऐतिहासिक व्यक्तीचा किंवा घटनेचा उद्धारकर्ता असताो. 'मराठेशाहीचा मागोवा' या ग्रंथात डॉ. पवारांनी मराठ्यांच्या इतिहासातील अनेक अनभिज्ञ व्यक्ती व घटनांचा शोध लावून जणू उद्धारच केला.

छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी, महाराणी ताराबाई, छत्रपती राजाराम, सेनापती संताजी घोरपडे या चरित्रग्रंथांशिवाय डॉ. पवारांनी मराठेशाहीच्या कालखंडावरील अनेक ग्रंथांना आपली विद्वत्तापूर्ण प्रस्तावना लिहिली आहे. या प्रस्तावनांनी इतिहासातील अनेक अंधारे कोनाडे उजळले. त्या घटनेच्या आकलनाच्या वाटा बदलल्या. त्या व्यक्तिरेखांचं चौथं परिमाण मांडलं गेलं. जुन्या गृहितकांना टक्कर देण्यासाठी नव्या अस्मिता निर्माण झाल्या. आणि शेवटी त्यातून त्यांनी प्रबोधन हे अंतिम ध्येय सिद्ध केलं आहे.

मराठेशाहीतील व्यक्तिरेखा व कालखंड साधन चिकित्सा करून मांडत असताना डॉ. पवारांचा आधुनिक महाराष्ट्राच्या जडघडणीत योगदान असणाऱ्या व्यक्तींवर लिहिण्याचा समांतर प्रवास चालू होता. त्यामुळेच त्यांनी गेल्या ५० वर्षांत जवळजवळ स्वतः लिहिलेल्या चरित्रग्रंथांना व अनेक अभ्यासकांच्या ग्रंथांना प्रदीर्घ प्रस्तावना लिहिल्या. यातून शिवचरित्राचा वेध, जेम्स लेनचे प्रकरण, मराठ्यांचा स्वातंत्र्ययुद्धाचा कालखंड, उपेक्षित मराठा सरदार, रोड मराठ्यांचा समाजशास्त्रीय शोध, राजर्षी शाहूंसारख्या महानायकाचे चरित्र, नाना पाटलांच्या प्रतिसरकारचा धगधगता कालखंड, सत्यशोधक कार्यकर्त्यांचे बंडखोर जीवन, डॉ. बाळकृष्णांसारख्या महान इतिहासकाराचे कार्य, अशा अनेक गोष्टींतून ऐतिहासिक सत्य उलगडले. डॉ. जयसिंगराव पवारांच्या संशोधन विषयातील विविधता, त्यातून उलगडत जाणारा प्रदीर्घ पट, त्याचे विश्लेषण करतानाची त्यांची बहुआयामी दृष्टी, तसेच भाषिक शैली व ऐतिहासिक संदर्भ यांचा सुयोग्य मिलाफ याची अनुभूती त्यांच्या सर्व प्रस्तावना एकत्र केल्यावर आली. म्हणूनच त्यातील निवडक प्रस्तावना एकत्र करून त्या वाचकांसमोर ठेवून ती अनुभूती त्यांनाही देण्यासाठी ही खटपट केली आहे.

## शिवचरित्र व जेम्स लेन

इतिहासलेखकाला भूतकाळातील घटनांचा वर्तमानावर झालेल्या भद्र व अभद्र परिणामांची दखल घ्यावी लागते. अशीच एक अभद्र घटना २००३ मध्ये घडली. जेम्स लेन या अमेरिकन अभ्यासकाने 'Shivaji : Hindu King in Islamic India' या ग्रंथातून राजमाता जिजाबाईंच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणारी विधाने केली. त्यांचे पर्यवसान भांडारकर इन्स्टिट्यूटवरील हल्ल्यात झाले. महाराष्ट्राचे सांस्कृतिक व सामाजिक जीवन ढवळून निघाले. मग जेम्स लेनच्या या अविचाराला विचाराने प्रत्युत्तर द्यावे, असे आवाहन

महाराष्ट्रातील विचारवंतांनी केले. ते आवाहन स्वीकारून डॉ. जयसिंगराव पवारांनी, डॉ. वसंतराव मोरे यांच्या 'जेम्स लेन : संशोधक की विध्वंसक' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतून जेम्स लेनच्या अनैतिहासिक व स्फोटक लिखाणाची ऐतिहासिक पुराव्यानिशी चिरफाड करून सत्य समोर आणले.

या प्रस्तावनेत डॉ. पवारांनी जेम्स लेन हा कोण, त्याचे पुण्याशी असणारे स्नेहाचे बंध आणि त्याच्या इतिहास आकलनावर पडलेला पुणेरी विद्वानांचा प्रभाव स्पष्ट केला आहे. विशेष म्हणजे, लेनच्या तथाकथित विधानांचा समाचार घेण्याआधी त्यांनी लेनने शिवचरित्राच्या केलेल्या साधनांच्या चर्चेची, ग्रँट डफ, रानडे, म. फुले, केळुसकर, वि. का. राजवाडेंसारख्या अभ्यासकांच्या मांडलेल्या दृष्टिकोनांची दखल घेतली आहे.

याबद्दल डॉ. पवार म्हणतात ''लेननं म. फुले यांच्या शिवाजी महाराजांवरील पोवाड्याची आणि त्यामधील नव्या सामाजिक दृष्टिकोनाची खास दखल घेतली आहे, याची नोंद घ्यावयाला हवी.'' इतकेच नव्हे, तर ते पुढे म्हणतात, ''गेल्या ३५० वर्षांत शिवाजी महाराजांची कथा कशीकशी विकसित होत गेली, त्यामागे त्या त्या लेखकाचे काय उद्देश होते, हा विषय खरोखरच नवा व चांगला होता. लेन इथंच थांबला असता तर शिवचरित्राचा अलीकडच्या काळातील एक अभ्यासू पाश्चात्त्य भाष्यकार म्हणून मराठी माणसाने त्याचे कौतुकही केले असते. पण लेनला इथंच थांबायचं नव्हतं.'' इथे हे लक्षात घेतले पाहिजे की, डॉ. पवार लेनशी वैचारिक लढाई करायला उतरले आहेत, तरीही त्याच्या या शिवचरित्राकडे पाहण्याच्या अभ्यासू दृष्टिकोनाला ते बेदखल करत नाहीयेत. तसेच 'त्याला इथंच थांबायचं नव्हतं!' असं म्हणत त्याची बदनियतही स्पष्ट करतात.

लेनने त्याच्या पुस्तकात दिलेल्या पाच अकल्पनीय विचारांमधील 'शिवाजी महाराजांचे कौटुंबिक जीवन दुःखी होते,' या विचाराचे खंडन करताना डॉ. पवारांनी दुय्यम साधनांवर व उत्तरकालीन बखरींवर आधारित लेनचे निष्कर्ष खोडून काढले आहेत आणि त्याची संशोधनपद्धत इतिहासलेखनशास्त्रात बसणारी नाही, असे म्हटले आहे.

लेनच्या जिजाबाईबद्दलच्या 'त्या' आक्षेपार्ह विधानांचा समाचार घेताना त्यांनी अमेरिकन संस्कृतीत वाढलेल्या लेनला व त्याला ही कुचाळकी पुरवणाऱ्या प्रवृत्तींनाही दोषी ठरवले आहे. डॉ. पवारांच्या मते, लेनच्या उद्गारात पाश्चात्त्य संस्कृतीचा दंभ आणि मराठी माणसांच्या बुद्धीची नकळत

हेटाळणी आहे. त्याने बखरी, धार्मिक ग्रंथ व पुराणसदृश ग्रंथांतील अतिरंजित कथांचा चिकित्सा न करता आधार घेतलाय, पण वा. सी. बेंद्रेंसारख्या शिवचरित्रकाराच्या संशोधनाची दखलही घेतलेली नाही.

या प्रस्तावनेत डॉ. पवारांनी लेनबद्दलच्या स्वतःच्या मतांना पुष्टी देणाऱ्या इतर विचारवंतांचे विचारही दिले आहेत. भांडारकर इन्स्टिट्यूटवरील हल्ल्याचे त्यांनी समर्थन न करता, याला लोकशाही जमान्याशी सुसंगत नसणारी कृती म्हटले असले तरी, ती कृती म्हणजे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या बुरख्याखाली वर्णवर्चस्वबाधित इतिहास हेतुपुरस्सर पसरवणाऱ्यांविरुद्धचा तो संताप होता, असेही म्हटले आहे. आणि शेवटी त्यांनी 'अभिव्यक्तिस्वातंत्र्य, की अस्मिता' असा प्रश्न उपस्थित करून करोडो मराठी लोकांच्या हृदयात श्रद्धेचे स्थान असलेल्या एका समाजमातेच्या चारित्र्यावरील हल्ला, हा दगडमातीच्या निर्जीव वस्तूंवरील हल्ल्यापेक्षा अधिक निषेधार्ह मानला आहे.

शेवटी जेम्स लेन प्रकरणाचा बोध मांडताना, या प्रकरणाचा महाराष्ट्राच्या समाजकारणावर झालेला गंभीर परिणाम, यामुळे पुन्हा उफाळून आलेला ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद याची चर्चा करून समाजधुरीणांनी ही दरी कशी बुजवली जाईल हे पाहिले पाहिजे, अशी गरजही बोलून दाखवली आहे.

या प्रस्तावनेत डॉ. पवारांनी ऐतिहासिक वास्तव सांगून सत्य उलगडण्याचा प्रयत्न तर केला आहेच; पण त्याहीपेक्षा लेनने काय लिहिले यापेक्षा का लिहिले, त्यामागील हेतू काय, आणि त्याचा परिणाम काय झाला, हे प्रकाशित केले आहे. हे करत असताना त्यांची दुधातले दूध आणि पाणी वेगळं करून दाखवणारी निरामय व न्यायोत्पन्न नजर दिसून येते.

**शिवचरित्रांचे वेध**

शिवाजी महाराजांच्या अद्भुत जीवनपटावर आणि युगप्रवर्तक दृष्टीवर लिहिण्याचा मोह अनेक इतिहास अभ्यासक व संशोधकांना झाला आहे. यात शिवछत्रपतींचा समकालीन कवी परमानंदापासून ते ग्रँट डफ या पाश्चात्त्य अभ्यासकापर्यंत आणि न्या. रानडेंपासून ते त्र्यं. शं. शेजवलकरांपर्यंत अनेक शिवचरित्रकार आहेत. तसेच शिवछत्रपतींच्या एकेका अद्वितीय पैलूवर प्रकाश टाकण्यासाठी आपल्या संशोधनाचा कस लावणारे अनेक अभ्यासकही आहेत. अशा मोजक्याच पण सिद्धहस्त शिवचरित्रकारांच्या शिवचरित्रांना एका सूत्रात बांधण्याचे अवघड काम डॉ. जयसिंगराव पवारांनी 'शिवचरित्रांचे वेध' या प्रस्तावनेत केले आहे. यात त्यांनी परमानंदाच्या

संस्कृतमधील शिवभारताची डॉ. आ. ह. साळुंखेंनी केलेली चर्चा-चिकित्सा दिली आहे. यात त्यांनी 'सनय व सामुद्रिक मत' अशा परमानंदाने लावलेल्या विशेषणांचा लौकिक अर्थ व गुह्यार्थ स्पष्ट केला आहे. केवळ या शब्दांच्या अर्थाने शिवछत्रपतींच्या गुणवैशिष्ट्यात आणि पर्यायाने शिवचरित्रात भर पडली आहे.

मराठ्यांच्या इतिहासलेखनातून शिवाजी महाराजांच्या कार्याला आपल्या पाश्चात्त्य भिंगातून पाहण्याचा प्रयत्न केला तो साताऱ्याचा पोलिटिकल एजंट ग्रँट डफ याने. त्याच्या वसाहतवादी इतिहासलेखनातील गृहितक देऊन डॉ. पवारांनी त्याला छेद देणाऱ्या न्या. रानड्यांच्या Rise of Maratha Power या राष्ट्रवादी इतिहासलेखनाचा परामर्श घेतला आहे. न्या. रानड्यांनंतर रियासतकार सरदेसाईंनी शककर्ता शिवाजी कसा मांडला आहे, हे सांगून डॉ. पवार कृष्णराव अर्जुन केळुसकर या साक्षेपी चरित्रकाराच्या शिवचरित्राच्या चिकित्सापूर्ण मांडणीकडे वळतात. त्यांच्या मते, महात्मा फुल्यांचे सहकारी असणाऱ्या केळुसकरांच्या शिवचरित्राच्या मांडणीतून सत्यशोधक तत्त्वे डोकावतात. शिवचरित्र हे केवळ आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रेरणादायी आहे असे नव्हे, तर समता, न्याय व बंधुता या तत्त्वावर आधारित नवसमाजनिर्मितीसही ते मार्गदर्शक ठरणारे आहे, असा केळुसकरांच्या समग्र शिवचरित्राचा मथितार्थ असल्याचा डॉ. पवारांचा दावा आहे.

डॉ. पवारांनी सरकारांचा सर्वश्रेष्ठ विधिलिखित असणारा राष्ट्रनिर्माता, मानवतावादी असामान्य नेता आणि सिंहासनाधिष्ठित वैराग्यशील ऋषी शिवाजी राजा आपल्यापुढे ठेवला आहे. सरकारांप्रमाणे आणखीन एका अमराठी शिवचरित्रकाराने शिवछत्रपतींचे कार्य राष्ट्रीय स्तरावर नेले, त्या डॉ. बाळकृष्णांच्या शिवचरित्राचेही वेगळेपण येथे दिलेले आहे. डॉ. पवारांना बाळकृष्णांच्या पोर्तुगीज, डच व इंग्लिश नोंदी व वृत्तान्तांनी सजलेले शिवचरित्र लाख मोलाचे वाटते.

त्र्यं. शं. शेजवलकर या शिवचरित्रकाराच्या मनश्चक्षूंसमोर असणारा विजिगीषू शिवाजीराजा डॉ. पवारांनी वेधला आहे. यात शेजवलकरांनी मांडलेले शिवछत्रपतींच्या कामगिरीचे रहस्य, त्यांचे जगाच्या इतिहासातील स्थान आणि नवी व्यवस्था उदयास आणणारा महापुरुष, ही प्रतिमा त्यांनी विशेषत्वाने दिली आहे. यातील शेजवलकरांचे 'शिवाजीचे स्वतंत्र मन त्याच्या स्वतंत्र राज्याचे अधिष्ठान होते' हे वाक्य मराठ्यांच्या इतिहासाचा वेगळाच आयाम दर्शवते.


डॉ. पवारांनी या प्रस्तावनेत वा. सी. बेंद्रे यांच्या मांडणीतील शिवाजी महाराजांच्या राजनिष्ठा व देशनिष्ठा यातील अद्वैत मांडले आहे. शिवछत्रपतींची हिंदवी स्वराज्याची निर्मिती म्हणजे महाराष्ट्रीयांच्या आचारधर्मातील क्रांती होती हा बेंद्रेचा विचार, त्यांनी दिलेली या क्रांतीची गुणवैशिष्ट्ये नोंदवून स्पष्ट केला आहे. तसेच बहुभाषाकोविद पंडित सेतुमाधवराव पगडींचा फारसी साधनांमधून उलगडत जाणारा, स्वातंत्र्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन त्यासाठी अविश्रांत झगडणारा मानवश्रेष्ठ शिवाजीराजा दिला आहे.

अशा प्रकारे या प्रस्तावनेतून प्रत्येक शिवचरित्रकाराच्या मांडणीतून एक वेगळा शिवाजीराजा साकारलेला टिपला आहे. केवळ हे शिवचरित्रकारच नव्हे, तर आपली सारी हयात मराठ्यांच्या इतिहासाच्या संशोधनात घालवलेल्या निष्ठावान संशोधकांनी शिवछत्रपतींचे जे पैलू प्रकाशात आणले आहेत, तेही येथे नोंदवून डॉ. पवारांनी प्रस्तावनेच्या शेवटी वाचकाला शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचे मनोहारी दर्शन घडवले आहे. यात डॉ. अप्पासाहेब पवारांचा दिल्ली काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारा हिंदुस्थानातील एकमेव राजा शिवाजी आहे, तशी डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी मांडलेली शिवरायांची अर्थनीतीही आहे.

येथे शिवचरित्राचे व्यासंगी अभ्यासक नरहर कुरुंदकरांची, 'शिवाजी महाराजांची धर्मनिरपेक्षता व भारतीय राज्यघटनेतील सेक्युलॅरिझमची संकल्पना आणि यातील साधर्म्याची चिकित्सा दिली आहे. तसेच संरक्षणशास्त्र अभ्यासक ले. कर्नल म. ग. अभ्यंकरांच्या मांडणीतील महाराजांचे युद्धशास्त्र व संरक्षण संघटन हा पैलू प्रकाशात आणला आहे. डॉ. पवारांनी डॉ. भा. कृ. आपटे यांच्या मराठ्यांचे आरमार या लेखनातून समुद्रालाही पालाण घालणारा शिवाजीराजा आणि गडकोट अभ्यासक गो. नी. दांडेकर यांच्या लेखणीतून साकारत गेलेला दुर्गपुत्र शिवाजीराजा येथे प्रकर्षाने मांडला आहे.

महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील इतिहासकारांनी व अभ्यासकांनी शिवछत्रपतींच्या प्रत्येक पैलूचे, गुणवैशिष्ट्याचे व कृतीचे सूक्ष्म पातळीवर केलेले विश्लेषण एकाच आकृतिबंधातून या प्रस्तावनेत डॉ. पवारांनी वाचकांसमोर ठेवले आहे.

**४थी आवृत्ती**




९/११च्या हल्ल्यानंतर...
ओसामाच्या भावजयीने उघड केलेली,
मुलींच्या स्वातंत्र्यासाठी तिने दिलेल्या
झगड्याची थरारक सत्यकहाणी...


## साम्राज्य बुरख्यामागचे

**कारमेन बिन लादेन**

अनुवाद : **अविनाश दर्प**

पृष्ठसंख्या: १९६ । किंमत: २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

**३री आवृत्ती**




डेबोरा एलीस यांच्या 'द ब्रेडविनर',
'परवानाज् जर्नी' आणि 'मड सिटी'
या तीन सलग पुस्तकांच्या
मालिकेतील 'मड सिटी' चा अनुवाद

## शाझिया

**डेबोरा एलीस**

अनुवाद : **अपर्णा वेलणकर**

पृष्ठसंख्या : १४० । किंमत : १५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.


## द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ

### खिळवून ठेवणारी 'आज' ची गोष्ट...

इंग्रजीतून सरस लेखन करणारे भारतीय लेखक, ही काहीशी दुर्मिळ गोष्ट ! त्यातही हे लेखन 'आज'च्या पिढीच्या लेखकाचे असेल, तर हा योग अधिकच दुर्मिळ बनतो! चेतन भगत हे नाव अशा दुर्मिळ लेखकांपैकी आहे. 'फाईव्ह पॉइंट समवन' आणि 'वन नाईट ॲट द कॉल सेंटर' या चेतन भगत यांच्या आधीच्या साहित्यकृतींनी उत्तम लोकप्रियता मिळवली आहे. त्या लौकिकाला साजेल असे लेखन आणि ज्वलंत विषय हाताळणारे भगत यांचे 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ' हे पुस्तक सुप्रिया वकील यांनी अनुवादित करून मराठी वाचकांच्या हाती दिले आहे. आयआयटीतून पदवी मिळवलेल्या भगत यांनी 'इंटरनॅशनल इन्व्हेस्टमेंट बँकिंग करियर' सोडून पूर्णवेळ लेखनाला वाहून घेतले आहे. 'मला कौतुकप्राप्त लेखक होण्यापेक्षा वाचकप्रिय लेखक व्हायला आवडेल.' असे भगत स्वतः म्हणतात कारण कौतुकाचा बहर ओसरतो, टिकून राहतं ते प्रेम...! असं वाचकांचं प्रेम भगत यांना लाभेल, अशी ग्वाही त्यांच्या या तिसऱ्या साहित्यकृतीनेही निर्माण केली आहे.

लेखनाचा विषय निवडण्यात भगत यांनी वेगळेपण जपले आहे. 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ' चे प्रत्येक पान वाचकाला खिळवून ठेवते. पुस्तक खूप पूर्वी काही घडून गेलेल्या गोष्टींपेक्षा ज्या


घटनांचे संदर्भ ‘आज’च्या पिढीच्या मनात ताजे आहेत, त्यांचा संदर्भ देते आणि त्याच काळात पुस्तकातील घटना घडतात. या घटना म्हणजे गुजरातच्या भूजमधील प्रलयकारी भूकंप, गोध्रा प्रकरण आणि भारतीयांचे क्रिकेटप्रेम ! योगायोगाने विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे सत्र जे गेल्या सहा महिन्यात घडले, त्याचाही एक संदर्भ मराठी वाचक या लेखनाशी जोडू शकतील.




स्वतःच्या हातून घडलेल्या तीन चुकांचे प्रायश्चित म्हणून आत्महत्येचा मार्ग स्वीकारू पाहणारा एका हुशार ‘बिझनेसमन’, त्याचे मित्र, त्यांना अचानक गवसलेला अत्युच्च गुणवत्ता असणारा, पण पैलू पाडण्याची गरज असणारा क्रिकेटमधला ‘कोहिनूर’ आणि त्याला पैलू पाडावेत म्हणून या मित्रांनी केलेलं जिवाचं रान... कथानक म्हटलं तर असं सांगता येईल; पण हे कथानक उलघडत नेताना पानापानांवर खुशखुशीत-अर्थपूर्ण संवादांची जोड देत लेखकाने जे भाष्य केलं आहे, ते बिनतोड आहे. हे भाष्य करायचं म्हणून केलेलं नाही. त्या प्रत्येकाला काही संदर्भ आहेत, शैलीचं वैशिष्ट्य आहे. खरे तर धर्म, भाषा यांविषयी कुठलेही भाष्य करणे, हा सध्याच्या काळात जोखमीचा मुद्दा झाला आहे. कोणत्या शब्दावरून किंवा उल्लेखावरून ‘अस्मिते’चे प्रश्न निर्माण होतील, याचा भरवसा नाही. या पार्श्वभूमीवर ‘द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ’ या पुस्तकातील भाषा, मांडणी, संवेदनशील ठरणारे संदर्भ अतिशय नेमकेपणाने व्यक्त झालेले दिसतात. पुस्तकाचा ‘फोकस’ या उल्लेखांमुळे बदलणार नाही, याची काळजीही लेखकाने घेतली आहे. ऐन भरातील युवा मनांना आलेलं नैराश्य, ते करीत असलेला संघर्ष, अपरिपक्व वयातल्या या तरुणाईचा राजकारण्यांकडून होणारा वापर, नैसर्गिक आपत्ती आणि मानवी डोकेफिरूपणा यातून जन्मणारे क्रौर्य, शिक्षणपद्धतीचा साचेबंदपणा, सर्व प्रकारचे ‘वेगळेपण’ नाकारणारी इथली ‘व्यवस्था’... यावरील तरुणाईच्या प्रतिक्रिया पुरेशा तीव्रतेने या लेखनात व्यक्त झाल्या आहेत. त्यात अभिनिवेश नाही; पण कळकळ नक्कीच आहे आणि ती थेट भिडणारी आहे. या तिन्ही मित्रांच्या कुटुंबियांचे आणि

त्यांच्यातील परस्पर संबंधांचेही चित्रण लेखकाने ठसठशीतपणे केले आहे. नायकांचे प्रेमप्रकरणही पुरेशा हळुवारपणे तरीही धाडसीपणाने व्यक्त झाले आहे. व्यक्तींची नावे बदलली असली तरी सुजाण वाचकाला त्या व्यक्ती सहज ओळखता येतात. चेतन भगत यांनी प्रवाही इंग्रजीत केलेले हे लेखन त्याच प्रभावीपणे अनुवादक सुप्रिया वकील यांनी मराठीत आणले आहे.

## द ओडेसा फाइल




आपण गोष्ट वाचत जातो. पीटर मिलरच्या आणि त्याच्या जॅग्वार गाडीच्या मागोमाग जात राहतो. खरंतर त्या गाडीतून आपण पण जात राहतो. त्याचा बेधडक मागोवा, त्यातले जीवावरचे धोके आणि त्याच्या मागे असलेले अनेक गुप्तहेर आपण हा थरार अनुभवत राहतो. सालोमन टौबरच्या डायरीतल्या अनेक गोष्टींनी आपण देखील हललेले असतो. ती पुस्तकातली गोष्ट राहत नाही. आपली होऊन जाते. आपली राजकीय मतं काहीही असली तरी ते कल्पनेपलीकडचे अत्याचार बघून आपण दिग्मूढ होत जातो. फ्रेडरिक फोर्सिथने वास्तवावर आधारित अफलातून पुस्तक लिहिलंय. हे त्याचं दुसरं पुस्तक. १९७२साली प्रकाशित झालेलं हे पुस्तकं त्याला जगभरात प्रसिद्धीच्या शिखरावर नेणारं ठरलं. त्यावर रोनाल्ड निम याच्या दिग्दर्शनाखाली तेव्हढाच अफलातून सिनेमा निघाला. हे पुस्तक आपल्याला दुसऱ्या महायुद्धाच्या दिवसात घेऊन जातं. आपण अगोदर कुठेतरी धूसरपणे वाचलेलं असतं. मतं ठाम केलेली असतात. पण हे पुस्तक वाचून मात्र आपण हादरतो. पुस्तकातल्या पिटर मिलरच्या मागे आपण जात राहतो. मोसाद आणि अनेक गुप्तहेर यांच्या देखील मागोमाग जातो. खूप थ्रिलिंग आहे. मोसादने मिलरच्या सुरक्षिततेसाठी आपला एक गुप्तहेर लावलेला असतो. मिलरला हे अजिबात माहित नसतं. मिलर प्रत्येक भयानक संकटातून वाचत राहतो. एकदा तर त्याच्या जॅग्वारमध्ये बॉम्ब लावतात. जॅग्वार त्यात पूर्णपणे नष्ट होते पण मिलर मात्र वाचतो. शेवटी तर तो भयानक जखमी होतो. मोसादचा गुप्तहेर

त्याला वाचवतो. फ्रँकफर्टमधल्या हॉस्पिटलमध्ये जेव्हा चार पाच दिवसांनंतर त्याला शुद्ध येते, तेव्हा तो गुप्तहेर बाजूलाच असतो. तो त्याचा हात हातात घेतो. मिलर त्याच्याकडे प्रश्नार्थक मुद्रेने बघून विचारतो. ''मी तुला ओळखलं नाही.'' तो मिष्कीलपणे हसत म्हणतो. ''मी मात्र तुला उत्तम ओळखतो.'' तो खाली वाकतो आणि त्याच्या कानात हळू म्हणतो, ''ऐक मिलर! तू हौशी पत्रकार आहेस. अशा पोचलेल्या लोकांच्या मागे लागणं तुझं काम नाहीये. तू या क्षेत्रात पकलेला नाहीयेस. तू खूप नशीबवान आहेस, म्हणून वाचलास. टौबरची डायरी माझ्याकडे म्हणजे मोसादकडे सुरक्षित आहे. ती मी घेऊन आता इस्रायलला जाणार आहे. तुझ्या खिशात मला सैन्यातल्या एका कॅप्टनचा फोटो मिळालाय. तो कोण आहे? तुझे बाबा आहेत का?'' मिलर मान डोलावून होय म्हणतो. मग तो गुप्तहेर म्हणतो, ''आता आम्हाला कळतंय की तू जीवावर उदार होऊन एडुयार्ड रॉस्चमनच्या एवढ्या मागे का लागलास. तुझे बाबा जर्मन असूनही रॉस्चमनमुळे त्यांना जीव गमवावा लागला होता.'' मग तो गुप्तहेर विचारतो की, ''तुला मिळालेली ओडेसा फाइल कुठे आहे?'' मिलर त्याला ती पोस्टाने कुणाला पाठवली ते सांगतो. ''जोसेफ!'' तो गुप्तहेर मान डोलावतो. मिलर त्याला विचारतो. ''माझी जॅग्वार कुठे आहे?'' जोसेफ त्याला सांगतो की, ''त्यांनी तुला मारण्यासाठी त्यात महाशक्तिशाली बॉम्ब ठेवला होता. त्यात ती पूर्णपणे जळली. कारची बॉडी न ओळखण्यासारखी आहे. जर्मन पोलीस ती कोणाची आहे, हे शोधणार नाहीयेत. तशी व्यवस्था केली गेलीय. असो.! माझ्याकडून एक छोटासा सल्ला ऐक. तुझी गर्लफ्रेंड सिगी फार सुंदर आणि चांगली आहे. हॅम्बर्गला परत जा. तिच्याशी लग्न कर. तुझ्या जॅग्वारच्या इन्शुरन्ससाठी अर्ज कर. तीही व्यवस्था केली गेलीय. तुझ्या गाडीचे सगळे पैसे तुला ते परत देतील. जॅग्वार परत घेऊ नकोस. त्या सुंदर कारमूळे नेहमीच तुझा ठावठिकाणा त्यांना लागत होता. आता मात्र तू साधी अशी वोल्कसवॅगन घे. आणि शेवटचं, तुझी गुन्हेगारी पत्रकारिता चालू ठेव. आमच्या या क्षेत्रात परत डोकावू नकोस. परत जिवंत राहण्याची अशी संधी मिळणार नाही. त्याचवेळी त्याचा फोन वाजतो. सिगी असते. फोनवर एकाचवेळी ती रडत असते आणि आनंदाने हसतदेखील. थोडयावेळाने परत एक फोन येतो. हॉफमॅनचा. त्याच्या संपादकाचा. ''अरे आहेस कुठे? बरेच दिवसात तुझी स्टोरी आली नाहीये.'' मिलर त्याला सांगतो. नक्की देतो. पुढच्या आठवड्यात. इकडे तो

गुप्तहेर जोसेफ तेल अव्हीवच्या लॉड विमानतळावर उतरतो. अर्थात त्याला न्यायला मोसादची गाडी आलेली असते. तो त्याच्या कमांडरला सगळी गोष्ट सांगतो. मिलर वाचल्याचं आणि बॉम्ब बनवण्याची ती फॅक्टरी नष्ट केल्याचं देखील सांगतो. कमांडर त्याचा खांदा थोपटून म्हणतो, ''वेल डन ! पुस्तक जरूर वाचा. भाषा खूप सोपी आणि सहज समजणारी आहे. जगातलं एक नामांकित आणि लोकप्रियतेचा उच्चांक गाठलेलं पुस्तक आहे.

**- प्रकाश पिटकर**


## काबुलीवाल्याची बंगाली बायको




काबुलीवाल्याची बंगाली बायको काल हे पुस्तक वाचायला घेतले आणि पुस्तकं वाचूनच पूर्ण झाले. एका भारतीय महिलेची कहाणी आणि ती ही अफगाणिस्तानसारख्या देशामधील, खेड्यातील. बंगाल मधील हिंदू कुटूंबातील एका सुशिक्षित मुलीने सर्वांचा विरोध झुगारून एका परदेशी अफगाणिस्तानमधील तरुणाशी लग्न केलं. सासरच्या माणसांना भेटण्यासाठी अफगाणिस्तानमधील एका छोट्याशा गावात मोठ्या विश्वासाने ती तिकडे गेली आणि साधारण आठ वर्षं बंदिवासात तिला अफगाणिस्तानमध्ये रहावे लागले. तिला आलेले अनेक बरे-भुरे अनुभव या पुस्तकामध्ये सांगितले आहेत. तालिबान परिस्थितीतील, अफगाणिस्तानमधील जीवन, शेती पद्धती, जीवनमान कसे आहे. हे सर्व या पुस्तकात सांगितलेले आहे आणि आठ वर्षांनंतर परत सुस्मिता बॅनर्जी (भारतात आलेले आहे दोन-तीन वेळेस पळून जाण्याचा प्रयत्न) यांनी भारतात येण्यासाठी केलेले प्रयत्न या पुस्तकात दिलेले आहेत.

**- भाऊसाहेब पवार**

# राजा रवि वर्मा




आज खूपच दिवसांनी एका बैठकीत पुस्तक वाचून पूर्ण केले. राजा रवि वर्मा ह्या विख्यात चित्रकाराची हा जीवनप्रवास. कादंबरी खिळवून ठेवते. आपण रवि वर्माच्या कथेत इतके गुरफटत जातो की, जणू त्यातले एक पात्रच ! रणजित देसाई सरांनी ह्या कादंबरीसाठी पाच वर्षे अभ्यास केल्याचे, देशविदेशात फिरून माहिती गोळा केल्याचे म्हटले आहे, ते अगदी यथार्थ वाटते. एकूणात रवि वर्मा ह्यांचा प्रवास दाखविताना जे डिटेलिंग केलेलं आहे ते अफाट अभ्यास करूनच शक्य आहे. चित्र, रंग आणि चित्रकला ह्यांचाही अभ्यास प्रचंड कमाल आहे. अगदी बारिक बारिक सांगायचे झाल्यास पूर्वी रंग खलून तयार केले जात. मग विदेशातून तैल रंग येऊ लागले. हा सगळा प्रवास कमाल रेखाटला आहे. अगदी एक उदाहरण द्यायचे झाल्यास एके ठिकाणी ब्राउन ते ब्लॅक मधील अनेक रंगछटांचा उल्लेख केला आहे. तो पाहून आपण थक्क होतो. अप्रतिम सुंदर विख्यात असणारी त्यांची काही निवडक चित्रे देखील समाविष्ट केलेली आहेत. कलाकाराचे कलेच्या रंगात न्हाऊन जाणे, त्याच्यावर लुब्ध होणाऱ्या स्त्रिया, सर्वसामान्य आणि जुनाट विचारसरणीची बायको सगळं अगदी सहज मांडलं आहे. मामाचा मृत्यू, आईचा आणि धाकट्या भावंडांचा मृत्यू प्रसंग कमाल चितारला आहे. हिंदू देवदेवतांची विटंबना केली असा आरोप ठेऊन लावलेला खटला आणि त्याचे यशस्वीपणे केलेले खंडन अप्रतिम आहे. नग्नता ही पाहणाऱ्याच्या दृष्टीत असते हे राजा रवि वर्मा इतक्या प्रभावीपणे मांडतात की आहा! चित्रकाराच्या आयुष्यात मॉडेल म्हणून येणाऱ्या अलौकिक सौंदर्यवतीबाबत कुठेही पुरुष म्हणून आकर्षण न वाटणं इतकं कलाकार म्हणून स्थिर असणं कमाल आहे. देहापलीकडची ओढ अतिशय सुंदररित्या वाचकांपुढे ठेवली आहे.

थोडक्यात, प्रेमात पाडणारे हे पुस्तक जरूर जरुर वाचा.

**- यशश्री रहाळकर**

## १६ ऑगस्ट ते १५ सप्टेंबर २०२१ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ ऑगस्ट दरम्यान खास सवलत**

**१७ ऑगस्ट - सचिन पिळगांवकर यांचा जन्मदिन**
‘हाच माझा मार्ग’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३५९/-**

---

**१८ ऑगस्ट - गुलज़ार यांचा जन्मदिन**
‘त्रिवेणी’, ‘रावीपार’, ‘गुलज़ार पटकथा’, ‘धागे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७२०/- । सवलत किंमत १०६९/-**

---

**१९ ऑगस्ट - सुधा मूर्ती यांचा जन्मदिन**
‘आजीच्या पोतडीतल्या गोष्टी’, ‘अस्तित्व’, ‘आयुष्याचे धडे गिरवताना’, ‘बकुळा’, ‘डॉलर बहू’, ‘गरुडजन्माची कथा’, ‘गोष्टी माणसांच्या’, ‘हरवलेल्या मंदिराचे रहस्य’, ‘कल्पवृक्षाची कन्या’, ‘महाश्वेता’, ‘परीघ’, ‘पितृऋण’, ‘सुकेशिनी आणि इतर कथा’, ‘थैलीभर गोष्टी’, ‘वाइज अँड अदरवाइज’, ‘स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं...’, ‘पुण्यभूमी भारत’, ‘सामान्यांतले असामान्य’, ‘सर्पाचा सूड’, ‘आजी-आजोबांच्या पोतडीतील गोष्टी’, ‘तीन हजार टाके’, ‘त्रिशंकू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३७३५/- । सवलत किंमत २८१२/-**

---

**१९ ऑगस्ट - फ्रॅन्क मॅक्कोर्ट यांचा जन्मदिन**
‘अँजेलाज ॲशेस’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३८०/- । सवलत किंमत २८९/-**

---

**२० ऑगस्ट - नारायण मूर्ती यांचा जन्मदिन**
‘नारायण मूर्ती : मूल्यं जपणारं एक अद्वितीय आयुष्य’, ‘अ बेटर इंडिया

अ बेटर वर्ल्ड' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४३५/- । सवलत किंमत २८९/-**

**२० ऑगस्ट - एस. एल. भैरप्पा यांचा जन्मदिन**
'पर्व', 'वंशवृक्ष', 'काठ', 'आवरण', 'मंद्र', 'पारखा', 'तडा', 'तंतू', 'परिशोध', 'सार्थ', 'उत्तरकांड', 'साक्षी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४५००/- । सवलत किंमत ३१०९/-**

**२१ ऑगस्ट - ब्रॅड थॉर यांचा जन्मदिन**
'ब्लॅक लिस्ट', 'फुल ब्लॅक' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ६०९/-**

**२३ ऑगस्ट - नेल्सन डेमिल यांचा जन्मदिन**
'द लायन्स गेम ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ६९५/- । सवलत किंमत ४९९/-**

**२४ ऑगस्ट - अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ यांचा जन्मदिन**
'मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स', 'टिअर्स ऑफ द जिराफ', 'द नंबर वन लेडिज डिटेक्टिव्ह एजन्सी', 'द फुल कबर्ड ऑफ लाइफ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६०९/-**

**२५ ऑगस्ट - तसलिमा नासरिन यांचा जन्मदिन**
'लज्जा', 'फेरा', 'निर्बाचित कलाम', 'नष्ट मेयेर नष्ट गद्य', 'निर्बाचित कबिता', 'आमार मेयेबेला', 'उधाण वारा', 'फरासि प्रेमिक', 'द्विखंडित', 'शोकोलग्रिह हारालोजार', 'भाबनागुलो', 'बेशरम' या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३२७०/- । सवलत किंमत १९३९/-**

**२५ ऑगस्ट - फ्रेडरिक फोरसाइथ यांचा जन्मदिन**
'नो कम बॅक्स', 'द अफगाण', 'द फिस्ट ऑफ गॉड', 'मध्यस्थ', 'द ओडेसा फाइल', 'द किल लिस्ट' या पुस्तकसंचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२२५/- । सवलत किंमत १३३९/-**

---

**२५ ऑगस्ट - पुरुषोत्तम अग्रवाल यांचा जन्मदिन**
'नाकोहस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२६ ऑगस्ट - नॅन्सी यी फान यांचा जन्मदिन**
'तलवारीचा शोध' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**२९ ऑगस्ट - धिरेंद्र मेहता यांचा जन्मदिन**
'छावणी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १४९/-**

---

**२९ ऑगस्ट - इनग्रिड बर्गमन यांचा जन्मदिन**
'माय स्टोरी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

---

**३१ ऑगस्ट - शिवाजी सावंत यांचा जन्मदिन**
'मृत्युंजय' (नाटक), 'छावा' (नाटक), 'मोरावळा', 'कांचनकण', 'शेलका साज', 'अशी मने असे नमुने', 'कवडसे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११०५/- । सवलत किंमत ६८९/-**

**खालील संचांवर १ ते १५ सप्टेंबर दरम्यान खास सवलत**

**१ सप्टेंबर - कुंदन तांबे यांचा जन्मदिन**
'नाना आणि महादजी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-**

**२ सप्टेंबर - नसीमा हुरजूक यांचा जन्मदिन**
'चाकाची खुर्ची' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

**२ सप्टेंबर - शुभदा गोगटे यांचा जन्मदिन**
'अस्मानी', 'चला जाणून घेऊ या! फेंग शुई', 'चला जाणून घेऊ या! सुख', 'चला जाणून घेऊ या! रेकी', 'चला जाणून घेऊ या! तणाव व राग', 'चला जाणून घेऊ या! स्मरणशक्ती कशी वाढवावी', 'घर', 'हृदयविकार निवारण', 'निरामय यशासाठी ध्यान', 'सांधा बदलताना', 'वसुदेवे नेला कृष्ण', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७७५/- । सवलत किंमत १०८९/-**

**२ सप्टेंबर - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**
'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत १०९/-**

**५ सप्टेंबर - जागतिक शिक्षक दिन**
'टू सर, विथ लव्ह', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन टीचर्स', 'स्टोन्स इन्टू स्कूल्स', 'थ्री कप्स ऑफ टी', 'मी मलाला' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १४३५/- । सवलत किंमत ८१९/-**

**६ सप्टेंबर - नितीन बापट यांचा जन्मदिन**
'आंधळा न्याय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**१० सप्टेंबर - डॉ. एम. बी. कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'शब्दचर्चा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-**

**१० सप्टेंबर - नील डोनाल्ड वॉल्श यांचा जन्मदिन**
'संवाद परमेश्वराशी - भाग २', 'संवाद परमेश्वराशी - भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ५२९/-**

---

**१० सप्टेंबर - विजया जहागिरदार यांचा जन्मदिन**
'कर्मयोगिनी (इंग्लिश)' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २७९/-**
'कर्मयोगिनी (मराठी)' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१० सप्टेंबर - सुनील दांडेकर यांचा जन्मदिन**
'आगमन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २६०/- । सवलत किंमत १८९/-**

---

**१२ सप्टेंबर - बिभूतिभूषण बॅनर्जी यांचा जन्मदिन**
'पथेर पांचाली' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१५ सप्टेंबर - दया पवार यांचा जन्मदिन**
'विटाळ', 'चावडी', 'जागल्या', 'पासंग', 'कोंडवाडा', 'पाणी कुठंवर आलं गं बाई...' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६७५/- । सवलत किंमत ४७९/-**

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**


**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**
आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.
**author@mehtapublishinghouse.com**

नवीन संहिता... नवा आशय...



परमपूज्य दलाई लामा यांचे जीवन आणि
त्यांच्या शिकवणीतून मिळणारे धडे

# करुणेचं बीज




लेखक
**परमपूज्य दलाई लामा**
चित्रकार
**बाओ लु**
अनुवाद
**योजना यादव**





**संपूर्ण सचित्र**

पृष्ठसंख्या : ३२
किंमत : ₹८०
पोस्टेज : ₹५०

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/08/2021 Posting Date : 11/08/2021


## नवीन संहिता... नवा आशय...



















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,